वर्षाची आगाऊ रु० ९ टांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " ०८
किरकोळ अंकास..............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस.........०१

Rs.
annum in advance 5 Postage 13 as.
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly...........3 " 2 as.
Single co y ...............................4

Advertisements.
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition der line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 4 MARCH 1889 NO.9

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख ४ माहे मार्च सन १८८९ इ० अंक ९

*K. B. Rele and caclousco smosteffi.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतमिध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितीही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी (प्रदर) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तशुद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा वाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, ढांग्या घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटं मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेली सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

(सही) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगले कमिशन मिळेल. प्यकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाघाचीं तेले मलम, साबू, पॉम्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांची व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
ज्युबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २१ वर्षांचा कर्णनाद गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
समजतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०१ आ.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

पुसद तारीख २७।१।८९
रा०रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

हवामानः—थंडी आपल्या लवाजम्यानिशीं कुच करण्याचे विचारांत आहे. हल्लीं सकाळीं मात्र थोडीशी गुलाबी थंडी पडते दुपारी इवळ्यांतच चांगली उष्णता भासते. ह्यावरून यंदा उन्हाळा कडक जाईल असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. नदीचें पाणी फार कमी झालें आहे. व त्यामुळें पाण्यास वास येऊं लागला आहे. कांहीं घाटा वरचे पाण्यांत शेवाळ झालें आहे तें काढून टाकण्याचा उद्योग झाल्यास चांगलें होईल हल्लीं नदीचे वरचे आंगास धुण्याची मनाई केली आहे. तरी त्या बद्दल जशी व्यवस्था असावी तशी नाहीं. फक्त धुतलें ह्मणजे पाणी खराब होतें असें नाहीं; तर जेणेंकरून पाणी खराब होतें असें सर्व व्यवहार बंद केलें पाहिजेत. त्या पासून लोकांस अडचण पडेल हें खरें; तरी तीं सर्वांच्या कल्याणा करितां आहे. लोकांनीं होईल तेथ पर्यंत विहिरीचें पाणी प्यावें. ज्या ठिकाणीं नदीचेंच पाणी पिणें भाग पडेल तेथें लोकांनीं तें तापवून निववावें मग पिण्या करितां त्याचा उपयोग करावा.

येथें हवेचा उपद्रव सुरू आहे. ह्या थिवसांत हा उपद्रव सुरू झालेला पाहून लोक फार हवालदील झाले आहेत. आसून खरा उन्हाळा तर पुढेंच आहे. रोज दोन तीन आजारी असतात. ह्यांपैकीं कांहींवर वैकुंठची यात्रा करण्याची पाळी येते. येथील. डाक्टर रा. कल्याणराम हे लोकांस मदत करण्यास रात्रंदिवस झटत आहेत तरी ईश्वरी संकेतापुढें कोणाचें चालत नाहीं.

आग—येथें मागील आठवड्यांत मोठी आग लागली होती. ती भरदुपारीं लागली तरी ही लोकांस विझवितां आली नाहीं; कारण त्या वेळेस अग्निनारायणास वायूचें चांगलें सहाय होतें पुढें मग वारा कमी झाला तेव्हां महाराजांची स्वारी शांत झाली एकंदर पंचवीस तीस घरांची आहुती झाली ह्यांपैकीं बहुतेक घरें गरीब लोकांचीं गवताचीं होतीं. आतां बिचाऱ्यांस दुपारची सावलीही नाहींशीं झाली हवेच्या उपद्रवानें लोकांचीं मनें अस्वस्थ आहेत तशांत त्यावर हेंही एक संकट आलें आहे. ईश्वर जसें ठेवील तसें रहाणें भाग आहे. आगीच्या वेळेस उपयोगी पडेल असा पुसद सारख्या गांवास एकादा बंब जरूर आहे. तो पोलिस खात्याच्या स्वाधीन असावा व त्याची देखरेख त्याजकडून व्हावी. अशाउपयुक्त कामीं रयतेच्या पैशाचा विनियोग झाला असतां रयत सरकारचे फार आभार मानील. ह्या आगीच्या वेळेस आनंदाची गोष्ट एवढीच कीं, त्यावेळेस मनुष्याचे किंवा जनावराचे जिवास इजा झाली नाहीं.

इकडे आंबोळीचें पाणी तापविण्या करितां उघड्या जागेंत चूल घालण्याचा फार प्रचार आहे आणि त्या दिवसांत वारा फार सुटतो व त्या बरोबर त्या उघड्या जागेंतील चुलींतील ठिणगी वगैरे बाहेर उडून जाऊन त्या पासून असे अनर्थ गुदरतात. तरी ह्या चुली बाहेर उघड्या जागीं घातल्या नाहींत तर चांगलें होईल.

यात्राः- येथून १०—११ कोसावर धनबड ह्मणून गांव आहे. तेथें ह्या दिवसांत यात्रा भरत असते. परंतु यंदा त्या ठिकाणीं महामारीचें ठाणें असल्यामुळें यात्रा भरली नाहीं तसेंच येथून एक कोसावर मोहे ह्मणून एक खेडें आहे तेथें ही महा शिवरात्र झाल्यावर यात्रा भरत असते. मग यंदा ती बाईच्या भीतीनें भरेल किंवा नाहीं हे आज सांगतां येत नाहीं. भरली तरी सालाबाद इतकी भरणार नाहीं असें वाटतें. लोकांनीं ही ह्या कडु दिवसांत यात्रेंत जाऊन आपला जीव धोक्यांत घालूं नये.

स्वाऱ्याः—मे० स्यानिटरी कमिशनर व इ० जनरल आफ पोलिस ह्यांच्या स्वाऱ्या येथें आल्या होत्या. तसेंच मे० डे० क० सा० हे ही येथें वार्षिक तपासणी करितां आले होते. त्यांची स्वारी येथून उमरखेड येथें गेली व तेथून दारूचे भट्यांचे लिलाव करण्या करितां वाशिमास गेली. ह्या दवऱ्या पासून रयतेचा फायदा होत असेलच ह्यांत कांहीं संशय नाहीं. तरी आफिसर लोकांनीं आपले ताब्यांतील लोकांचे वर्तनावर फारच सक्त नजर ठेविली तर ह्या ही पेक्षां जास्त फायदे होतील व रयतेच्या मनांत सरकाराविषयीं पुज्यबुद्धि आहे ती दृढ होत जाईल.

लिलावः— ह्या तालुक्याचे दारूच्या मक्त्याच्या लिलावाची रकम यंदा खूपच चढली ह्मणून समजतें. ह्या वरून लोक दिवसेंदिवस नीतिमान होत आहेत असें जे कित्येक लोक ह्मणतात ते खोटे ठरूं पहात आहे. लोकांत दारू पिण्याचा प्रचार फारच आहे असें ह्मणणें भाग पडतें. हे लिलाव वाशिम येथें झाले त्यावेळेस येथील तहशिलदार साहेब ही तेथें होते. ज्यांशीं आपणांस नेहमी काम पडणार असे सरकारी अधिकारी अशा वेळेस हजर असले ह्मणजे लिलावांत बोलणारे लोकांचा कधीं कधीं नफा अगर नुकसान होण्याचा संभव आहे.

ह्या तालुक्याचे लोकल बोर्डाचे मेंबराची निवड पुन्हा पुढील महिन्यांत होणार आहे. लोकांस लोकल बोर्ड हे आहे काय? ह्याबद्दल चांगली माहिती करून दिल्या खेरीज ह्याचा फारसा उपयोग होणार नाहीं. जे मेंबर निवडले जाणार ते सुशिक्षित व धीट असे असले पाहिजेत. नाहीतर " माझें मत हो हुजु-

सारखेंच आहे." असें ह्मणणाऱ्यांस कांहीं कमतरता नाहीं. असें मेंबर पुढें न येतात ह्मणजे झालें. पहावें आतां कसकसें होतें तें.

आपला

एक "मित्र"

**वऱ्हाडसमाचार.**

मिती फाल्गुन शुद्ध ३ शके १८१०

शेतकी सुधारणा संबंधि नवीनच सुरू झालेलें मासिक पुस्तक त्याच्या कर्त्याकडून आह्मांकडे आलें त्याचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करितो. याच्या नावावरूनच उद्देश कळणार आहे. असल्या पुस्तकाची सध्यां आह्मांस फार जरूर आहे. इंग्रजींत ज्याला प्रोफेशनल लिटरेचर ह्मणतात. त्याचा आपल्यांत अगदीं अभाव आहे ह्मटलें तरी चालेल. इंग्लंड अमेरिका इत्यादि सुधारलेल्या देशांत प्रत्येक धंद्याची स्वतंत्र पुस्तकें, मासिक पुस्तकें व वर्तमानपत्रें हीं निघत असतात. आमच्या देशांत अशा प्रकारची नियमित कालीं निघणारी पुस्तकें आतांशा कोठें निघूं लागलीं आहेत. तथापि पुष्कळ प्रसंगीं लोकाश्रयाच्या आभावा मुळें त्यांची पुरःसरगती व्हावी तशी होत नाहीं. प्रस्तुत पुस्तक "शेतकरी" ह्या प्रमाणेंच आश्रयास पात्र होऊन सतत चालावें अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमच्या शेतकीची सुधारणा इच्छिणाऱ्या मंडळींनीं असल्या पुस्तकांस अगोदर आश्रय द्यावा.

## मुनिसिपल इलेक्शन
## (निवडणूक.)

अखेरीस सर्वांचें मागून कां होईना पण आह्मांस सन १८८९ एप्रील महिन्याचे पहिले तारखेपासून "लोकलसेल्फ गव्हर्नमेंट" चा फायदा मिळणार यांत बिलकूल संशय नाहीं. लोकलसेल्फ गव्हर्नमेंट स्कीम वऱ्हाडांत सुरू करावी ह्मणून ज्यांनी ज्यांना आश्रांत श्रम घेऊन खटपट केली त्यांना ती आतां अमलांत खास येणार हें ऐकून आनंद होणार आहे. लोकलबोर्ड स्थापन करण्याचा ठराव बाहेर पडल्याबरोबर सर्व तहशिलदार लोकांस हुकमावर हुकूम सुटं लागले कीं लोकांना ह्या बाबतींत चांगली माहिती करून द्यावी, व सभासद वगैरे कसे निवडावे त्यांना काय काय लायकी पाहिजे हें ही स्पष्ट करून सांगावें. त्या हुकुमाअन्वये गेल्या दोन महिन्यांत बहूतेक तालुक्यांतून बराच गडबड उडून गेली होता त्या संबंधाची निवडणूक गेल्या आठवड्यांत प्रत्येक तहशिलीचे ठिकाणीं झाला. या कामाकरितां मेसर्स ग्यारेट, माणिकशा व हरभाननी साहेब सारखे पोलिस आफिसरांची नेमणूक झाली होती. ह्या कामाकडे सर्व प्रकारे सरकारचें लक्ष असल्यामुळें त्याबद्दल येथें जास्त लिहिण्याची जरूर दिसत नाहीं. आतां मुनसिपाल कमेटींत सभासद निवडून देण्याचा हक्क फक्त आकोला, उमरावती, एलिचपुर, आकोट, खामगांव व शेगांव ह्या सहा शहरांसच दिला आहे. सदरहू निवडणूक जानेवारी अगर फेब्रुवारी महिन्यांत व्हावयास पाहिजे. ह्मणजे नवीन कमेटीचें काम एप्रील महिन्याचे पहिले तारखेपासून सुरू व्हावें असे नियमांत असून आमचे येथील निवडणूक एप्रिलचे १ ले तारखेस व्हावयाची ह्मणून नोटीस झाली आहे. दुसरे ठिकाणीं कोणची तारीख ठरली हें आह्मांस अद्याप कळलें नाहीं. नियम बाहेर आल्या बरोबर कमेटीनें मे. डिक. साहेबांस कोणची तारीख नेमावी ह्मणून विचारलें त्याचा जबाब येथच्या येथेंच सुमारें एक महिन्यानें मिळाला परंतु ह्या कामाची व्यवस्था कोणी व कशी लावावयाची ह्याचा निकाल अद्याप कोठें आमचे कळण्यांत आला नाहीं ह्यावरून सरकारी अधिकाऱ्यांना ह्या गोष्टी कितपत आवडतात हे सहज दिसून येईल. कसे ही करून आमचे हल्लीचे व्हाईस प्रेसिडेंट साहेबांनीं लवडीत लवड करून मत देण्यास कोणकोणास अधिकार आहे त्या लोकांच्या कशा तरी यादी करून एवढ्या मोठ्या शहरांत दोन तीन ठिकाणीच लाविल्या आहेत. वार्ड नंबर २ करितां टाऊन हालांत वार्ड नंबर १ करितां हे० क० चे कचेरींत लावल्या आहेत परंतु वार्ड नंबर १ करितां यादी त्या वार्डांत न लावितां चुकून ती वार्ड नंबर २ मध्येंच लाविली आहे असें कळतें. याद्या इतक्या सुरेख लिहिल्या आहेत कीं त्या थोडक्या लोकांनाच वाचतां येतील. फक्त वार्ड नंबर ३ ची यादी स्वच्छ आहे. याचा दोष आमचे नूतन व्हाईस प्रेसिडेंट साहेबांकडे मुळींच नाहीं. कारण त्यांनीं तरी काय काय कामें करावीत. त्यांचें मागें एक तहशिलीचें मोठें काम आहेच त्यांत ही वेळ वसुलाची. तालुका लोकल बोर्डाचें काम आज पावेतो होतेच इतक्यांत कोणी अधिकारी अगर फौज आली कीं चाळले सरबराई करायाला. इतक्या कामाच्या कचाट्यांत असतां ही ते मु० क० चें काम करीत आहेत ही आमचेवर मेहरबानगी समजावयाची. कामाचे बाबतींत निवडणुकाचे जे नियम छापून आले आहेत त्यांतील कांहीं कांहीं नियमांची माहिती लोकांना व्हावी या हेतूनें त्या नियमांचें भाषांतर मराठींत करून त्याच्या प्रती सर्व शहरभर डकविल्या आहेत त्यांत एक ढोबळ चूक झाली आहे व ती चूक आमचे बंधु शुद्धवऱ्हाडीचे कर्ते यांनीं गत अंकांत लेख लिहितांना जशीच्या तशीच ठळक दिली आहे. मुळचे नियम आह्मी पाहिले त्यांत "पाच रुपये अगर पाचाहून जास्त रुपये कर देणार इसम कमेटींत सभासद होण्यास लायक आहेत" असें असून त्याचे ऐवजीं "पाच रुपयांहून जास्त कर देणार मात्र सभासद होण्यास लायक" असे लिहिलें गेलें आहे त्यामुळें पुष्कळ लोकांचा गैरसमज झाला आहे. सभासद होण्यास लायक कोणचे कोणचे लोक आहेत त्यांची ही यादी लाविली नाहीं. अद्याप निवडणूकीस सुमारें एक महिन्याची आवधी आहे करितां मे० व्हा० प्रे० साहेबांस आमची अशी सूचना आहे कीं त्यांनीं नियमांचे भाषांतरांत झालेली चूक लवकर दुरस्त करावी व जरी कायद्यांत नाहींतरी हे पहिलेंच वर्ष आहे ह्मणून लोकांना समजण्यासाठीं सभासद होण्यास लायक असलेल्या लोकांची स्पष्ट यादी वार्डावार करून लावावी ह्मणजे फारशी खटपट न करितां कोण लोक लायक आहेत व कोण नाहींत, कोणास आपण मत द्यावें वगैरे गोष्टींचा विचार करण्यास ठीक पडेल.

हें पहिलेंच वर्ष आहे ह्मणून मत देणारे लोकांस ह्या कामाची माहिती वार्डावार्डांतून सभा भरवून ती देणें अगदीं जरूर आहे. हें काम निदान या वर्षीं तरी मु० क० तील मेंबर लोकांनींच करायला पाहिजे आहे. कारण त्यांच्या हातून हें जितकें चागलें होईल तितकें दुसऱ्याच्या हातून तडीस जाणार नाहीं. करितां मि. शेख हैदरसारख्या परोपकारी व हुशार मेंबरांनीं शुष्क कामांत वेळ न घालवितां ह्या महत्वाचें कामाकडे लक्ष देऊन त्या बद्दल आपले हातून होईल तितकी खटपट करावी अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

म्यु. इलेक्शनचा हक्क मिळविण्याकरितां पहिल्यानें ज्यांनीं पुढारीपण घेऊन खटपट केली त्यापैकीं बरेच लोक बाहेर गांवीं गेले व जे हल्लीं येथें आहेत ते आतां मौन धरून स्वस्थ बसले आहेत. ह्या लोकांनीं जर पूर्वीं सारखी खटपट केला नाहीं तर खास ह्याचा परिणाम चांगला होणार नाहीं व तसें झालें ह्मणजे आमची अशीं कामें करण्यास अयोग्यतां मात्र दिसून येईल. ह्या लोकांनीं यंदाचे वर्षीं तरी निदान रामनामें न घेतां जास्त मेहनत व खटपट करून काम केल्यास त्याचें ह्मणजे पुढचे वेळीं दुसरे लोकांनां बरी ज्यास्त माहिती होईल.

निवडणूक करितांना होतां होईल तोंपर्यंत स्वतंत्र धंद्यांतील शिकलेले लोक निवडले जातील तितके बरें. आतां खरोखर स्वतंत्र धंद्यांतील लोक ह्मणजे व्यापारी अगर वकील लोक हे होत. ह्या पैकीं चांगले शिकलेले असे बहुत करून दुसऱ्या धंद्यांतील फार सांपडतील. ह्मणून मत देणारांनीं होता होईल तो पावेतों ह्या लोकां पैकीं जितके जास्त निवडले जातील असें खटपट केल्यास फायदेशार होऊन काम ही चांगलें होणार आहे.

शेवटीं मतदार लोकांस इतकीच विनंति आहे कीं त्यांनीं कोणाच्या आधिकाराकडे श्रीमंतीकडे, एटीकडे, धापांकडे अगर त्यांच्या निव्वळ मोठेपणाकडे लक्ष देऊन तुह्मांस आह्मी खास मत देऊं अशी वचनें देऊन गुंतवून घेवूं नये. नीट विचार करून चांगले विद्वान, मेहनती व माहीतगार व ज्याला आपली वेळ तिकडे देतां येईल असे तरतरीत लोक निवडण्यास जावें.

आमचे व्यवसाय बंधु रा. शुद्धवऱ्हाडी कर्ते यांनीं सभासद निवडून देण्या लायक कांहीं गृहस्थांचीं नांवानिशीवार यादी गेल्या अंकांत दिलीच आहे. त्यांच्याबद्दल आमचे कांहीं ह्मणणें नाहीं परंतु त्यांत पुष्कळ सरकारी नोकर आहेत. करितां निव्वळ स्वतंत्र धंद्यांतील लायक असणाऱ्या गृहस्थांचीं नावें आह्मी मत देणारे लोकां करितां खालीं देतों.

मि. देवराव विनायक वकील.

मि. आबदुल कादर. मि. सलीमखान.

मि. दत्तात्रय विष्णु भागवत वकील.

मि. शंकर गोविंद मि. नामदेव राजन्ना.

मि. गोविंद विश्वनाथ. मि. हिचिन्स.

मि. मौलवी हाकीमोद्दीन. मि. बहिमनजी.

मि. गोपाळ खुशाल. मि. तुरावजी.

मि. रंगोरामचंद्र मि. वैदर्भ एडीटर.

मि. शुद्ध वऱ्हाडीचे एडीटर

मि. मार्तंड लक्ष्मण वकील

मि. सखाराम मोरेश्वर खजीनदार

मि. नारायण चिंतामण डाक्तर.

मि. जयकृष्ण नगाजी.

मि. टिकमदास ताराचंद मि. शेखहैदर.

वऱ्हाड हायस्कूल मार्फ़ विद्यार्थी समाजाचें कामाचें पत्रक.

तारीख १६ माहे मार्च सन १८८९

सकाळ ८ ते १०

अध्यक्षाकडून समाजाची सुरुवात. मंडळीच्या भेटी ओळखी वगैरे. मागील वर्षांच्या सेक्रेटरीनें गेल्या वर्षांचा रिपोर्ट वाचणें.

दुपारचे २ ते ४

गणपतराव खापर्डे यांचें व्याख्यान.

४ ते ६

देशी खास्यापाव्या, खो खो, लान्टेनीस वगैरे.

रात्रीचे ८ ते ११

रा० नारायणबोवा घमंडे सातारकर यांचे कीर्तन

तारीख १७ माहे मार्च सन १८८९.

सकाळ ९ ते १०

दत्तो कृष्ण दामले यांचें व्याख्यान.

दुपारचे २ ते ४

मनुष्याच्या शरीर रचने विषयीं माहिती रामचंद्र नरसिंह मुधोळकर देणार.

४ ते ६

खेळणें.

८ ते ११

गायन

समाजा करितां जागा उमरावती हायस्कूलच्या कंपौंडांत तयार केली आहे तेथें बाहेर गांवांहून येणारे पाहुण्यांनीं उतरावें समाजाचे मंडळी करितां प्रातःकाळीं चहा नी व दोन वेळ जेवणाची तजवीज केली आहे. सकाळचे जेवणाची वेळ ११ वाजतांची व सायंकाळची ७ वाजतांची ठेविली आहे. सर्व येणेच्छु मंडळीनीं तेथें हजर रहाण्याची कृपा करावी.

उमरावती
ता. ९ मार्च १८८९

रामचंद्र नरसिंह मुधोळकर.
वासुदेव विठ्ठल दांडेकर.
सेक्रेटरी

**The Berar Samachar**

MONDAY MARCH 4 1889

### PLEA FOR CIVILIAN JUDGE TO OUR NEW HIGH COURT.

The Judicial scheme for Berar is to come at some time and distant future. The one essential feature of that scheme is the location of a High Court in the province. What we are concerned with however is not only the location of a High Court in the province affording people facilities of appeal to

the highest Court of the province but with the nature of the Judge who is to be honored with the seat on the bench of that High Court. We believe it is our duty to represent the general opinion of the public with regard to the matter. The suitors whose interests are likely to be affected by the appointment as also the bar fully share in the belief that a civilian judge is necessary; and the general expectation is that with the advent of the new judicial scheme the Judge of the High Court would be a civilian.

We believe there are good reasons to support this general idea. Civilian Judges who have had legal training must in the nature of things be better than others who have had no legal traning of any kind. If law is to be administered on the present system the men, who are to administer it must certainly be men of a stamp quite different from what it is now. If law is a science and a very complicated science people who have had no benefit of having received a particular training for that science cannot be expected to deal with it in a scientific way. We don't mean any slur on the present set of the higher functionaries who have to dispense law; they do judicial work which although it cannot compare favorably to work turned out by trained lawyers, is satisfactory on the 'rough justice' principle. But it must be said that that is not the principle which the public like to see acted upon in British Courts of law. We want men of the type of Mr. Obbard, of Mr. Nizamuddin and Mr. Khaparde.

But the reasons that make it desirable to have trained lawyers to be judges of District and Sessions Court are *a fortiori* applicable in the case of the High Court Judge or Judges. The High Court is the last resort of a suitor and it is therefore highly necessary that the best available persons only should be appointed to that office. The High Court has to exercise general supervisionary powers of control and discipline over all subordinate Courts and in order to ensure good work in the Lower Courts, it is extremely desirable that a highly trained lawyer should occupy the seat on the High Court Bench.

There are many good qualities our present set of the higher Judicial functionaries; and what experience of Judicial work they have had for many years past serves them in good stead; most of our Judges are also very courteous, and always attend to the convenience of the parties or their pleaders. But these are after all secondary qualities; a sound legal training, we hold, is the first requisite in a Judicial officer. There are worthy exceptions like Lt. Col. Bullock who although they have had no particular legal training do Judicial work very satisfactorily; but such instances only prove the rule that generally speaking a very good legal training is necessary to make a good Judge under our present system of administering justice.

As we are conscious that we are only reflecting the general public opinion in the matters we hope the authorities will not altogether ignore the wishes of the Berar public who are the persons mostly concerned with the appointment of the High Court Judge.

( Communicated )

## NEW DENUNCIATION OF THE NATIONAL CONGRESS AND THE HINDU RACE.

Our national Congress has been an institution, whichl,ike every other new political institution of significance has had its promoters and detractors. How ever it is a peculiarity, that it should have created a great alarm even when a child in the fourth year. No kindred child in the world has incurred an equal hatred and love in so early an infancy. No severer fight is maintained, no sharper recriminations have ever been exchanged. What in the eyes of the one, are the prognostics of a blessing, incarnate to the human race are the dark omens of a terrible evil in the sight of the other. The fathers and the relations of the child can see nothing but full philosophic and philanthrophic lineaments. They can see a mild benignity in expression, a calm deliberation in action, and a bright keen sight gleaming with all the thoughts of benevolence and innocence. But a perverted vision has been had of this very divine beauty by its enemies. They have been looking upon it as a monstrous production born at is very birth with teeth in its head an ugly serpentive form hissing and frightening with all the horrid-terrors of Milton's monsters of Sin's womb. It should be a phenomenon too hard to admit of any very easy explanation without a knowledge of human nature

The cause is plain and simple enough. We are a governed people; our Governors are a foreign nation. Ever through the history of the world, the governing classes have been too covetous to remit any, the least, of their prerogatives. It is the very nature of man. It is the very nature the father should wish to settle on his son his whole possession with his claims, all and entire to it. It is the very nature the English nation should be solicitors for a transmission of their Indian soverignity to their future generations without the least concessions. But here is a brilliant prospect for us. Here is a refreshing and cheering aspect. Civilization has done much to enlarge and ennoble European minds. Man is not a mere animate thing without any, howsoever small their dimensions be, powers of rationalism and kind thought. The sympathies of the European world have been much wider than before. The better part of human nature has been awakened. They look upon the human race as worthy of attention. They have been looking upon the most worthless indigence as an individual of their own species. They would never attempt to deprive him of his humanity. We need not be afraid here of the race of Tymurs. We need not be alarmed that a ten thousand human lives should be sacrificed to the Governor's pleasure. But the alarm is from within. We have Tymurs within ourselves. They have out Tymoured the barbarous Tartars. The blood thirsty Tartars glutted with a slaughter of a few individuals. But here our enemies have attempted to proscribe a human race hundred times larger than the victim of the conqueror. They have proscribed the whole race of Hindoos. They have denied any share of humanity to the race. We are no longer human beings. One of these new philosophers, is, what we should call him a simple Mr. or an honorable or a divine or a prophet, we are at a loss to know is our Sheik Hyder; a miraculous animate diamond under a heap of filth happily discovered though so late for giving to the world new logic new rhetoric and every other science new. Here is a compound of Aristotle and Gautama who has invented and developed a system of logic our from his own compounded brains. Here is in one and single individual at once a Bacon and a Darwin a Christ and a Mahomed a Shankaracharya and our old Mareech with all a venerable flowing gray beard In short all the greatest men of the world from times immemorial have been combined in a single individual The world shall wonder and covet a knowledge of the history of this miraculous development of human genius. Our Sheik Hyder with his literary pursuits, never extending beyond a reading without much spelling of Marathi Alphabets, has ventured upon the solution of problems, political and historical. He is a member of our Akola Local Committee and a retired policeman. He is a zealous and a leading anticongressionist of the Mahomedan population of the town. Under his auspices was recently held a meeting here of the followers of Mahomed. The object of the meeting was to exhort if possible the slaughter of cows in a direct antagonism of the endeavcurs of the Hindu community. The lecturer or rather the prime mover, and speaker in this little parliament, was the new philosopher. He begins with a slanderous tongue; for the National Congress indulges his spleen in his most usual volubility and finally suggests that the Hindoo movement has been prompted by some motion in that most abominable institution. Then he goes on to give his logical reasonings for his denunciations of the National Congress. Without any exposition of a definite sense of his vo-cabulary he conludes the Congress in an evil and assigns a plain simple reasoning. Had it been the statesman speaker proceeds, an institution of any benefit, he himself should and would have attended it and since he never has left his miserable hut to join this hateful gang, it is a murderous institution, so far is the new lolic of our new logician. Now proceeds the learned speaker to display his boundless knowledge of history and theology. Here is a Historian philosopher and a theologian, who has ransacked the history of the human race and theology during his sentinels nightly watch at the Treasury. After a calm and a deliberate pause, this worthy leader puts a most interesting question to his audience, who can bear witness, that the Hindoos have been a race created by *Alla*? Looking round about him with a triumphant look, as if defying an opposition the speaker answers the question himself "none" and hence the unheard of conclusion. This worthy Sheik Hyder frowned at last upon the Hindus for their endeavours to protect the poor animals and suggested to his listening audience, he should have to quit his Indian home for a foreign land in case of a failure in his exortations of Kine slaughter.

we should have taken no notice of this miserable old man. We have nothing to fear from his quadrunimous chagrin and chatterings. We blush we confess to have devoted a considerable time to this learned perade. We are aware the majestic and noble elephant walks on without the least fear of the spite fulbarks of a number of curs about him. We are confedent our National Congress must be held and respected in all its annual sittlings in spite of the venomous calumuies of Sheik Hyder and his followers. We are confident that the Hindoos are a race of antiquity Hindooism is an old religion, recognized in the category of the world's religions though not Mr. Sheik Hyder's. We have thought an account of the recent Mahomedan meeting and the worthy philosopher deserving an attention of our reading public rather as an entertaining treat than an event of significance. We have presented, here by we think, to the world a sample of the inexhaustible learning of a Mahomedan leading individual of the Anti Congressmovement here. In the plays of our Kalidasa the name of Vidushaka occurs almost as often as that of the king creating a fresh appetite for the delicious dishes of the play by variety. The bafoon or the fool has equally served the purpose of European plays. In our political plays on the stage somethihg of the sort was wanting and here this Sheik Hyder's wild and frantic self selection to cat the dignity of a states-man, a historian, a philosopher and a prophet would seen a happy diversion.

## वऱ्हाड.

या जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट बोर्डा करितां मेंबर निवडण्यासाठी येथील टाऊन हालांत गेल्या आठवड्यांत सभा भरली होती. लोकांस लोकल बोर्डाचे संबंधानें नियम अगदी वेळेस मिळाले व तेही सर्वांस मिळाले नसावे; यामुळें पुष्कळांस या बोर्डाचे संबंधानें असावी तसी माहिती नव्हती, असें दिसून आलें.

कर्नेल ग्रांट साहेब, दि० क० मागील आठवड्यांत दवऱ्यावरून परत आले.

नवीन जुडिशियल स्कीम अमलांत येणार त्या वेळीं कांहीं ऐ० अ० कमिशनरच्या जागा भरल्या जाणार आहेत तर बाहेरील नवीन लोक न आणतां प्रांतांतील हुशार तहशिलदार निवडून त्यांसच नेमतील व त्याच प्रमाणें खालच्या जागाही तशाच योग्य रीतीनें भरल्या जातील अशी आशा करितों.

भुसावळे पासून नागपूर पर्यंतचें रेलवेलायनीवर कांहीं गार्डांनीं पार्सलांतून व लगेजांतून चोरलेला जो माल सांपडला आहे. यांत वऱ्हाडांतील डा. ह्यूम व मि० फ्रयांक पो० इ० यांचा व कांहीं दुसऱ्या गृहस्थांचा चोरीस गेलेला माल सांपडला असें ह्मणतात.

## विक्रीस तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेलवे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फूट. दराची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉनन्ट्राक्टर गोंदिया.

## वर्तमानसार.

सेंटपिटर्सबर्ग येथें एक बर्फाचा सुंदर वाडा ( राजवाडा ) बांधला आहे.

त्यांत कांहीं पुतळे बसविले आहेत. ते ही बर्फाचे असून रात्रीं विजेचा दिवा लावल्यावर अप्रतिम शोभा दिसते.

रशियन सरकारानें इंग्लंडांतील कांहीं व्यापारी मंडळीकडे १ लक्ष लढाऊ घोड्यांची खोगिरें तयार करून पाठविण्या विषयीं लिहिलें आहे.

अमेरिकेंतील कित्येक शहांत गेल्या जानेवारी रोजीं प्रभंजनानें महदुत्पात्त करून सोडिला. या बदलची हकीकत डेलिन्यूज पत्रांत आली आहे, ती वाचूं लागलें ह्मणजे आंगावर रोमांच उभे रहातात. एक रेशमाची चौमजली गिरणी ह्या वादळानें पडून आंत २-३ शें मनुष्यें दडपून मेलीं. वाऱ्याच्या सपाट्या बरोबर कित्येक घरांवरील पत्रें उडून ते हवेमध्यें पाखरां सारखे उडत होते, व कित्येकांनीं वृक्षाग्रीं जाऊन मुक्काम केला होता घरांवरील विटा उडून त्यांचा गोफणगुंड्याप्रमाणें रस्त्यांतील लोकांवर सारखा मारा सुरू होता. एका घराचा २०० फूट लांबीचा मजला वाऱ्यानें उडवून नेला. दोन ग्यासाच्या कंपन्यानें ग्यासाचे तळावांत ९९ लक्ष फूट ग्यास साठविलेला होता, त्यांतील ग्यासानें विजेच्या मदतीनें पेट घेतला; तेव्हां जो कांहीं भडका उडाला तो लिहितां पुरवत नाहीं! निआगरा नदीच्या प्रसिद्ध धबधब्या जवळील प्रचंड पुलाचा या वादळानें नाश केला व कित्येक गाड्यांचा चुराडा होऊन गेला. वादळाचा जोर कमी झाला तो मागाहून बर्फवृष्टीनें मनावर घेतलें. इतकें बर्फ कोसळलें कीं कित्येक ठिकाणीं लोहमार्ग अगदीं गडप होऊन गेले व तारायंत्रासही तहकूब चिट्ठी मिळाली.

चिनांत बंडाचा उद्भव होऊन बंडवाल्यांनीं ब्रिटिश कन्सलिटचा बंगला आणि दुसरीं कांहीं घरें जाळून फस्त केलीं, अद्याप पर्यंत प्राण हानिमात्र झाली नाहीं. बंडवाल्याचा मोड करण्या करितां चिन सरकाराकडून तत्याचे ठिकाणीं सैन्याची रवानगी होत आहे.

म० मि०

चोराबद्दल सावाला शिक्षा—येत्या एप्रिल महिन्या पासून व्हाल्यू पेयेबल पार्सल पाठविणारानें असें शपथेवर लिहून दिलें पाहिजे कीं 'मी' जें हें पार्सल पाठवितों तें मालकानें मागविल्यावरून पाठवीत आहे. हे पार्सल पोंचविण्या करतां पोष्टास जें कमिशन किंवा हमाली द्यावी लागते ती ते पार्सल करणारानें प्रथम अगाऊ दिली पाहिजे परंतु जर पार्सल मालकानें न घेतां परत पाठविलें त्यास दिलेलें कमिशन परत करण्यांस येणार नाहीं. हा झालेला नवीन ठराव लबाड लोकांस बराच आड येईल पण त्या लबाडांना शिक्षा देते वेळीं सब घोडे बारा टके करून इतर लोकांनाही त्याबद्दल दुःख भोगावें लागत आहे। जों जों असले लबाडी बंद करणारे कायदे किंवा ठराव बाहेर पडत आहेत तों तों चोरांच्या व लबाडांच्या धंद्यांतही सुधारणा होत आहे. आतां व्हाल्यूपेएबल पार्सल पाठविणारानें मालकाकडून आलेलें पत्र दस्ताऐवज ह्मणून कडी कुलपांत ठेविलें पाहिजे.

काळ आला होता पण वेळ आली नव्हती:—अमेरिकेंतील न्यूयार्क शहरीं फासानें फाशी देण्याचें बंद झालें असून विजेच्या योगानें फाशी देण्याची रीत चालू झाली आहे. ती रीत प्रथम चालू होण्याच्या वेळीं १३ असामींस फाशींची शिक्षा देण्यांत आली होती परंतु दैव विचित्र आहे. असें ह्मणतात. तें खोटें नव्हे या १३ असामींस फासानें शिक्षा द्यावी असें ठराविलें होतें, विजेच्या योगानें मारावें असें ठरलें नव्हतें या करतां त्यांस तशा रीतीनें मारणें वाजवी नाहीं व फासानें फाशी देण्याची रीत बंद झाली तेव्हां या १३ आसामींस सोडूनच दिलें पाहिजे अशी त्यांच्या वकिलानें जज्जा पुढें तक्रार केली व ती जज्जास मान्य होऊन त्या १३ असामींस सोडून देण्यांत आलें इतकें सांगून एक गृहस्थ यावर असें ह्मणतो कीं आजपर्यंतचे कायम ठशाचे जज्जाचे शद्ब 'आरोपीस प्राण जाई पर्यंत लोंबकत ठेवावें' ते आतां फिरवून त्याच्या जागीं 'मेरेपर्यंत विजेच्या यंत्रांत ठेवावीं असें लिहिलें पाहिजे. दैवाची गती विलक्षण आहे.

ठा. अ.

युरोपांमध्यें लढाईची चिन्हें दिसूं लागली आहेत व त्या संबधानें ड्यूक आफ केंब्रिज हे जिब्राल्टर येथें गेले आहेत तेव्हां तेथें ताबडतोब सर्व बंदोबस्त होईल असें तारीख १८ च्या मार्निंग पोस्टमध्यें लिहिलें आहे.

चार्डजुईकडून सेंटपीटर्सबर्ग येथें गेलेल्या तारेवरून असें कळतें कीं अमीर अबदुल रहमान हे हालचाल न करतां स्वस्थ आहेत. शिवाय व्यापार ही चालू झाला असें से. पी. ब. च्या तारीख १८ च्या तारेवरून कळतें.

लंडन येथील इंपीरियल इन्स्टिटयुट करितां एक लक्ष रु० बक्षीस अशी तार महाराज होळकर यांजकडून प्रिन्स आफ वेल्स यांस गेली असें लंडनच्या ता० १९ च्या तारेवरून कळतें.

मद्रास येथें शरीफच्या कामाबद्दल फी सरकार जमा होऊन त्यास दरमहा ८९८ रुपये मिळतात. त्यांतून डेप्युटी शेरिफ यांचा पगार व इस्टाब्लिशमेंटचा खर्च देतात.

पार्लमेंटच्या सुरुवाती करितां ग्लाडस्टन साहेब इटलीहून लंडनास ता० २१ रोजीं परत आले.

अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या परीक्षा ता० २५ मार्च रोजीं व्हावयाच्या आहेत, म्याट्रीक्युलेशनच्या परीक्षेस १४१४ व बी ए. च्या परीक्षेस ७८ उमेदवार आहेत असें समजतें.

रशियानें अमिरांच्या संबधानें वदंता उठविली तेव्हां त्यांचा खामियाबकडे पुढें सरकण्याचा बेत दिसतो. त्यांणी आक्ससच्या काठीं फौज व तोफखाना जमाविण्याचा उद्योग चालविला होता. आतां तयारी झाली असेल तेव्हां कांहीं तरी निमित्त करण्याचा विचार दिसतो असें ह्मणतात.

मद्रासच्या गेल्या आडमिनिस्ट्रेशन रिपोर्टवरून विद्याखात्याची हकीकत कळते कीं, एकंदर शाळा १७,३९९ असून त्यांत एकंदर ५,०९,६९८ विद्यार्थी शिकत आहेत. मुलांची फी १४,८७,४४७ रु० जमा झाली असें समजतें.

सेविंग्स ब्यांकमध्यें लोकांची एकंदर १,६७,९९००० रु० ची ठेव आहे असें समजतें.

एका ग्रेंच जहाजावरील लोकांनीं सागालोवर तोफा सोडल्या पांच रशियाच्या शिपायांस जखमी केले. व बाकीच्या कासाकस लोकांस कैद करून ओबाक येथें नेलें असें एडनच्या तारीख २१ च्या तारेवरून समजतें.

इजिप्ट मध्यें धान्य अतिशय पिकत असें व तें बहुतेक सर्व नैल नदीच्या पाण्याच्या योगानें त्या देशांत हल्लीं दुष्काळ पडण्याचा प्रसंग आला आहे. कोणी दुष्ट लोकांनीं नैल नदीच्या एका फाट्याचा प्रवाह बदलून रानांत किंवा समुद्रांत नेऊन सोडला असें ह्मणतात. हे जर खरें असेल तर तो अर्धा देश उद्ध्वस्त होईल अशी भिती आहे.

सु० प०

गेल्या खानेसुमारीचे वेळीं जर्मनीमध्यें २६२ मनुष्यें शंभर वर्षांहून जास्त वयाचीं होतीं. पैकीं १६० स्त्रिया ७२ पुरुष होते. ह्यापैकीं सर्वांत मोठा जो मनुष्य होता त्याचें वय १२० वर्षांचे होतें.

क्राफर्ड साहेब निर्दोषी ठरणार असें बरेंच इंग्रजी पत्रकर्ते ह्मणतात.

ते०

---

## नोटीस

सिताई मर्द नारायण गुरव हल्लीं रहाणार भेंडी माहाली इस.

खालीं सही करणार यांजकडून:—

नोटीस देण्यांत येतें कीं, ज्या जिनगीवर कायद्या प्रमाणें व शास्त्रा प्रमाणें तुझी मालकी पोहोंचत नाहीं ती आमचे अविभागीत घर आणि शेत तूं पिराजी वल्लद मनसाजी यांस तारीख १२—२—८९ रोजीं खोटें व लबाडीनें खरेदी करून देऊन खरेदीखत लिहून दिलें वगैरे चालीनें वर्तून सदरहू इसमाचे घरीं राहत आहेस, यासाठीं या नोटिशीनें कळाविलें जातें कीं, तुझें करणें रद्द असोन त्या बद्दल आह्मी जबाबदार नाहीं यासाठीं कळविलें आहे तारीख २—३—८९ इ०

( सह्या )

१ उदेभान वल्लद भगवान निशाणी खुद्द.

१ लछमन वल्लद चंद्रभानजी निशाणी खुद्द.

---

## नोटीस.

पिराजी वल्लद मनसाजी देशमुख राहणार भेंडी महाली यांसी.

खालीं सही करणार याजकडून:—

नोटीस देण्यांत येतें कीं आमची भावजई सिताई मर्द नारायण इणें तुम्हास तारीख १२-२-८९ इसवी रोजीं जें घराचें व शेताचें खरेदीखत लिहून दिलें आहे तें तिनें अनाधीकार आमचे संमतीवाचोन व योग्य कारणा वाचोन तिची मालकी नसतां आणि आमचे समती वाचोन कपटानें व अनेक तऱ्हेच्या लबाडीमुळें करून दिलें आहे व तुम्ही करून घेतलें या मुळें तें कायद्यानें व शास्त्रानें तें रद्द आहे या साठीं तुह्मास या नोटिशीनें कळविलें आहे. तरी तुम्ही त्या प्रमाणें वर्तूं नये कळावें. तारीख २-३-८९

( सह्या. )

उदेभान वल्लद भगवानजी निशानी खुद्द.

लछमन वल्लद चंद्रभानजी निशानीं खुद्द.

---

## नोटीस.

खालीं सही करणार यांज कडून नारबा वल्लद खंडबा मराठे रा० मौ० मिठणापुर प्रगणें राणी उमरावती ता० यवतमाळ जि० वणी नोटीस देण्यांत येतें कीं, आपला बाप खंडबा याणी आपल्या हातांनीं आपलें चौघे मुलांस सारख्या वाटण्या करून दिल्या परंतु बाप मयत झाल्यावर तूं वडील असल्यामुळें स्थावर शेतें नंबर ६ स० नं० १—४—९—८—११—२४ हें तुझें नांवानें लागलीं गेलीं. पुढें तूं आपल्या हिश्याचीं शेतें नंबर २ स० नं० ८ व ११ हें विकून टाकलेंस व स० नं० २४ हा सावकारास दिला बाकी नंबर ३ हे आमचे आहेत. परंतु तुझें नांवानें असल्यामुळें तूं तीं शेतें विकणार आहेस असें समजतें. त्यास नोटीसीनें असें कळविण्यांत येतें कीं तुम्ही शेतें विकाल अगर गहाण ठेवाल तर तुम्हा पासून व घेणारा पासून नुकसान भरून घेतलें जाईल. व शिक्षेस ही पात्र व्हाल. कळावें.

तारीख २७—२—८९ इसवी.

( सही. )

पांडु वल्लद खंडबा मराठे

रा० मि० जि० यु०

---

## नोटीस.

घुनीलाल लछमनदास, मालक छगुलाल व भीवराव, जयपरशराम मालक मिठुलाल, छोटुलाल व हेमराज परशराम, मालक शिवलाल गुलाबचंद व रघुनाथदास, कनीराम व बंकुलाल बुलाखीदास वगैरे साहु रहाणार सोनाळे तालुके जळगांव यांस नोटीस देणार राघोजी बापुजी देशमुख रहाणार सोनाळे तालुके जळगांव यांजकडून कळविण्यांत येतें कीं, आपण सदरील पांच आसामीचें कर्जदार आहे असें नाहीं. आपणा शिवाय दुसरे लोकांचे ही मला देणें आहे सबब नोटीशीनें कळवितों कीं, माझ्या खुद्द मालकीच्या मिरासी वडिलोपार्जितच्या शेत्या तुह्मां लोकांपाशीं गहाण व ताबे गहाण असून तुमचे कर्जाची मजकडून आदाई होण्यासारखें दिसत नाहीं. सबब जीं शेतें आपल्या दस्तीवजांत आहेत. त्याचें सालचें पिकें घेऊन पंच मार्फतीनें ठराव ज्या प्रमाणें ज्याचा पैसा मजकडेस आहे व माझ्या शर्तीत दर साली किती पीक होतें त्या मानानीं पिकाईचें सालें ज्याची त्यानीं भरून घेऊन माझी जमीन मजला तुमचे रिणाचे आदाईत मुदत भरलेवर परत मजला माझी जमीन मिळेल व तुमचे ही कर्ज आदा होईल. या प्रमाणें माझे हेतू आहेत. आपल्या मनांत असें आहे कीं विनाकारण व्याज वाढून दिवाणींत दावे करून खर्चानीं बुडून सदरील शेतें आपणच पचवावी. ही इच्छा न धरितां माझ्या ह्मणण्या प्रमाणें पंच मार्फतीनें ठराव होऊन शेतांचे पिकांत मजला रिणांतून मुक्त करावें. सबब ही नोटीस दिलेल्या दिवसांपासून तुमचें व्याज बिलकुल मजवर चालू राहूं नये व मी नोटीस दिली सबब आपण विनाकारण दावे करून खर्च वाढवाल ते ही मजला मंजुर नाहीं. कारण मी देण्यास सिद्ध असून पुराव्या करितांच याचा जबाब मजला नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसांत जबाब पोष्ट मार्फतीनें अगर नोटीशीचा जबाब मिळावा कळावें तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १८८९ इसवी.

( सही. )

राघो वल्लद बापुजी

देशमुख द. खुद्द

---

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा अगाऊ ... ५ डाक ...
सहामाही " ३ " ०८
सालभखेर " ७ " ०८
किरकोळ अंकास.................................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस........०।

...annum in advance 5 Postage 13 as.
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly............3 " 8 as.
Single copy.....................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition derline3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL XXIII AKOLA MONDAY 11 MARCH 1889 NO. 10

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख ११ माहे मार्च सन १८८९ इ० अंक १०



*K. B. Rele and caclousco smosteffi.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. तें प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें विनयोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितो ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हे ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मिटविणारे मलम कायते हेच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या घरांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यात हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारीं असून निर्वोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगले कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पॉव्यारा, टिंकचर्स, सल्लाईन्स, इनोज, फ्रुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नादपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.



"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.



बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.



राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
समजूतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्या मुद्दां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.


## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुक्काम वाशीम ता० ६-३- ८९

रा० रा० वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष हल्लीं आकाश साभ्र असते. उष्णता फार होते. थंड पाण्यावर वासना जाते. माहामारीचा उपद्रव पुसद तालुक्यांत फार आहे. येथून सिरपुर साहा कोस आहे तेथें ही ह्या बयानें आपला अंमल बसविला आहे. आतांशी कोठें उष्णतेला प्रारंभ होत आहे. इतक्यातच ह्या भयंकर रोगानें प्रारंभ केला आहे. तर पुढें कसे होईल कोण जाणें.

गव्हांची कापणी बहूतेक झाली तेव्हां आतां पिकें चांगली होऊन शिलोक पदरांत पडली असें ह्मणण्यास हरकत नाहीं अजून फारशी स्वस्ताई होत नाहीं. पाण्याची तूट पडेल असा रंग दिसतो.

मि० त्रिंबकराव कायमचे पोस्टमास्तर रजेवरून परत आले. मिस्तर चंदुलाल हे आपल्या जागीं परत जातील. मोठ येथें टप्यांचें काम शाळा मास्तराकडे आहे. तेथें कांहीं पैशाचे कामात अफरा तफर अगर चूक झाली आहे अशा संशयावरून चौकशीकरितां मिस्तर व्यंकटराव पोस्टाचे इन्स्पेक्टर तिकडे गेले आहेत असें ह्मणतात. बिचाऱ्या तेथील मास्तरावर एखादें किटाळ न येवो.

मेहरबान डे० कमिशनर साहेब यांची स्वारी लोकल बोर्डाच्या कामाकरितां पुसदाकडे गेली आहे असें ह्मणतात. मे० डे० ए० इन्स्पेक्टर यांची स्वारी उमरखेडाकडे आहे. अजून पहिली वार्षिक तपासणी झाली नाहीं मग दुसरी कशी केव्हां होणार हें समजत नाहीं अलीकडे तपासणीचें वारे वादळें आहे असें ह्मणतात. कारण सरकारी शाळाशिवाय गांवठी शाळांची संख्या फार झाली आहे कोणास खाण्यास मिळत नाहींसे झालें कीं एखाद्या खेड्यांत जाऊन तेथें गांवठी शाळा स्थापन करून बसतो. येथील लोकल बोर्डाचें काम अकरा तारखेच्या सुमारास होणार आहे असें समजतें. मुनसिपालिटीचे मेंबर निवडण्याचें काम एप्रील महिन्यांत चालणार असें ठरल्याचे ऐकूं येतें. पाहावें मग लोक योग्य मनुष्यानां मतें देतात किंवा हांजी हांजी करणाऱ्यांना देतात. मतें देणारा घेणारांची योग्यता या प्रसंगी समजून येणार आहे.

रा० रा० बाळकृष्ण विश्वनाथ मास्तर बेलखेड तालुके अकोट यांची स्वारी पेनशनचें सरटिफिकीट करितां येथें आली आहे. आपापले जिल्हे सोडून हे लोक येथें कसे येतात कोण जाणे. हें लोक असें समजतात कीं काय येथें सरटीफिकिटांची खाण आहे. त्यांतून एक काढून न्यावें !! असो दरी भिचार लांबू येथ सतत. त्यांस विनमुख जाणें लागत नाहीं. ही मोटीच गोष्ट समजली पाहिजे. व त्या बद्दल दात्यांची मोठी तारीफ केली पाहिजे.

येथील इं. म. शाळेंतील थर्ड अ. मास्तर आजारी पडून एक महिन्याचे रजेवर गेले आहेत. त्यांस आराम होऊन बिचारे लवकर आपले कामीं हजर होवोत.

मे. डायरेक्टर साहेब बहादूर यांची स्वारी तारीख १।३।८९ इसवी रोजीं सायंकाळीं येथें आली व तारीख २।३।३।८९ रोजीं सर्व शाळांची तपासणी करून तारीख ३।३ ८९ इसवी रोजीं अकोल्याकडे रवाना झाली. वऱ्हाड शाळाखातें स्थापन झाल्या पासून कायमचे व बदली मिळून पूर्वीं पाच डायरेक्टर होऊन गेले परंतु कामाचो व खात्यांत काम करीत असलेल्या लोकांची पुरी माहिती असे हल्लींचेच डायरेक्टर होत. यांचे वृत्ती शांत. ह्या किती ह्मणून सांगू याची काम करण्याची शैली इतकी चांगली आहे कीं सर्व खात्यांचे मुगुटमणी आझिशन रासेडेंट साहेब बहादूर हे यांची स्तुति करितात. यांच्या सारखे योग्य चालक खात्याला यांच्या पश्चात मिळणें नाहीं अशी कित्येकांची समजुत आहे.

मे. हिंदुस्थानी डे. ए. इनस्पेक्टर यांची स्वारी येथें येऊन हिंदुस्थानी शाळेची परीक्षा झाली. निकाल बरा झाला असें ह्मणतात ह्या शाळेस मदत मे. तहशीलदार साहेब व मे. हशमत अली साहेब अव्वाली यांची असे. हें या उभय सरदारांनां मोठं भूषण आहे. परंतु हे लोक मराठी शाळा कडे ढुंकनही वर्षांनां पहात नाहींत. कोण जाणे. परंतु मे. हशमत अली साहेब यांच्या दातृत्वाची ख्याती आहे. यांनीं उमरावती हायस्कुलांत स्कॉलरशीप ठेविली आहे. असें ह्मणतात. अशा मोठ्या लोकांनीं विद्येच्या कामीं मदत करणें हें यांना मोठं भूषण आहे. पत्रकर्तेराव नीट वाचून छापावें लोभ कीजे हे विनंती.

आपला मित्र
"क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिती फाल्गुन शुद्ध ९ शके १८१०

## मुनिसिपल कर देणा सदरील जबाबदारी.

नवीन मुनिसिपल कायदा पसार होऊन

जरी बरेच दिवस झाले आहेत व तो जन्हाडास लागू ही जरी बरेच दिवसापासून केला आहे तरी मुनिसिपालिट्यांची रचना नवीन कायद्याप्रमाणें केलेली नव्हती ती आतां येत्या एप्रील महिन्या पासून होणार व तेव्हांपासून प्रत्येक मुनिसिपालिटींत लोकांनीं निवडलेले दोनतृतीयांश मेंबर व सरकारांनीं निवडलेले एकतृतीयांश मेंबर राहतील.

आज बरेच दिवसापासुन लोकांची अशी कुरकुर होती कीं मुनिसिपालटींत सरकारनियुक्त मेंबर असल्यामुळें मुनिसिपाल कमेटीची कामें चांगलीं होत नाहींत. कारण होतां होईल तोंपर्यंत असे सरकार नियुक्त मेंबर सरकार इच्छेविरुद्ध जात नसत व मुनिसिपालिटींत "जी हुजूर" "आपके माफक मेरीबी राय है" असेच ह्मणणारे लोक फार असल्यामुळें लोक हितांचे कामाची बरीच अनास्था होत असे. आमचे हें ह्मणणें खरें किंवा खोटें याजबद्दल वाचकांची पूर्ण खात्री असेलच. मे. सांडर्स साहेब माजी कमिशनर यांच्या उंटावर उमरावती मुनिसिपाल कमेटीनें जेव्हां कर बसाविला तेव्हां काय प्रकार झाला हे वाचकांच्या लक्षांत आहेच. कमेटीला एकदम ७००० रुपयांची टोपी बसली व त्यावेळेस एक ही मेंबर आपलें डोकें वर काढून सदरहू बद्दल विरुद्ध मत देण्यास धजला नाहीं. परंतु हल्लीं लार्ड रिपन साहेबांच्या अनुग्रहामुळें ती शोचनीय स्थिती जाऊन आपलें हित किंवा अनहीत करण्याचा अधिकार आपणास प्राप्त झाला आहे व तो चांगल्या रीतीन बजावणें हें आपलें कर्तव्य आहे.

जेथें अधिकार आहे तेथें जबाबदारी पाहिजे हे इंग्रजी राज्यनीतीच्या मुख्य तत्वांपैकीं एक तत्व आहे. आणि ज्या अर्थीं आपण बहुशः इंग्रजी राज्य नीतीचेंच अनुकरण करीत आहों. त्या अर्थीं आपणास ही तेंच तत्व मान्य केलें पाहिजे आणि सदरहु तत्व खरें आहे किंवा खोटें आहे याचा विचार करण्याची वेळ आपणास आज आली आहे. आपल्या मुनिसिपालिटींतून कायद्या अन्वयें जे लोक मत देण्यास योग्य आहेत त्यांना तुह्माला मत देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे अशाबद्दल व्हाईस प्रेसिडेंट साहेबांच्या सहीच्या चिठ्या आल्या आहेत व ह्या अधिकारापासून उत्पन्न होणारी जबाबदारी योग्य रीतीनें कशी बजाविली जाईल याबद्दल सर्वांनीं चांगला विचार केला पाहिजे.

मुनिसिपाल कमेटीचें काम केवळ रिकामपणाचे व बेफायदेशीर आहे व हे केवळ ज्यांना कांहीं काम नाहीं व ज्याना वेळ घालविण्यास कांहीं दुसरे मार्ग नाहींत त्यांनीच करावे अशी कित्येकांची समज आहे. परंतु ही समज केवळ अज्ञानपणाची आहे. मुनिसिपाल कमेटीचें काम करण्यांत फार महत्व व जबाबदारी आहे, आज आपल्या मुनिसिपालिट्याची स्थिती चांगली नाहीं. व ती तशी असण्याचें कारण केवळ लोकांचा हलगरजीपणा हें होय. पण या पुढें ही स्थिती सुधारणें इष्ट आहे किंवा नाहीं याचा प्रत्येक मत देणारानें विचार केला पाहिजे. हजारों जिवांचें सुखदुःख या म्युनिसिपालिट्यांवर अवलंबून आहे. त्याच प्रमाणें स्वच्छता पिण्याच्या पाण्याची शुद्धता व शिक्षणाचा चांगला पाया ह्या तीन गोष्टी आमच्या म्युनिसिपालिट्यांच्या हातांत आहेत व ह्या बद्दल चांगला विचार केला असतां आह्मी ह्मणतों हें सत्य नाहीं असें कोणी ह्मणणार नाहीं. प्राथमिक शिक्षण जर चांगलें मिळालें नाहीं तर आमच्या लोकांची विद्या आटोक्यलोप असें समजलें पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या चांगूलपणावर दुय्यम प्रतीचें शिक्षण अवलंबून आहे. आमच्या शिक्षणाचा पायाच जर कच्चा राहिला तर इमारत कोठून चढणार. शिक्षण चांगलें होण्या करितां शिक्षक वर्ग चांगला असला पाहिजे त्यांना योग्य वेतन मिळालें पाहिजे. त्यांचा पगार वेळेवर मिळाला पाहिजे, शाळागृहें चांगलीं असलीं पाहिजेत, व शाळांची देखरेख ठेविली गेली पाहिजे. गांवाची हवा चांगली ठेवणें व ती बरी असली तिला बिघडून देणें हें म्युनिसिपालिटीचें काम आहे. शहराला विपूल पाण्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी म्युनिसिपालिटीवर आहे. आणि तें पाणी स्वच्छ निरोगी आहे किंवा नाहीं हें पहाणें व तसें नसल्यास योग्य उपायांची योजना करणें हेंही काम म्युनिसिपालिटीचेंच आहे. रोजच्या रोज शहरांतील घाण निघते किंवा नाहीं, शहरांतील घाणेरडीं ठिकाणें स्वच्छ होतात किंवा नाहीं, नवीन घाण न होण्या करितां कोणचे उपाय योजावेत लोकांना घाणेरड्या सवई बऱ्या वाईट रीतीनें सोडावयास लावणें, घरें प्रशस्त व हवाशीर होतील अशा बद्दल काळजी ठेवणें; व रस्ते रुंद करण्या बद्दल नेहमीं मनांत कळकळ बाळगणें व हरएक प्रसंग आला असतां त्याचा उपयोग करून घेणें इत्यादि सर्व कामें म्युनिसिपालिटीचीं आहेत. हीं कामें महत्वाचीं व जबाबदारीचीं नाहींत असें ह्मणतां येईल काय! आपल्या अकोल्यांत नेहमीं रोगराई असते व बहुतेक दरसाल वाखा उत्पन्न होतो याला म्युनिसिपालिटी कांहीं अंशीं कारण नाहीं काय! आजपर्यंत वर लिहिलेलीं कामें सरकाराकडून किंवा त्यांनीं निवडलेल्या लोकांकडून होत असल्यामुळें त्याच्या बऱ्या वाईटाबद्दल आपण जबाबदार नव्हतों. व अशाचें खापर सदरहू मेंबरावर किंवा सरकारावर फोडण्यास तयार होतों. परंतु हल्लीं आपली स्थिती बदलली आहे. आतां आपणास नांवें ठेवण्यास मार्ग नाहीं. बरें वाईटाचे जबाबदार या पुढें आपण होऊं. आपल्या मुखत्यारांनीं जें काम केलें तें आपण केलें असें समजलें पाहिजे. जो काय विचार करावयाचा तो आधीं केला पाहिजे, कारण या निवडलेल्या लोकांच्या हातीं आपण आपल्या सुख दुःखाची जबाबदारी देतों आहों; तर या बद्दल चांगला विचार करून आपलें कर्तव्य बजाविलें पाहिजे.

निवडणूक करणाऱ्या लोकांनीं आपलें कर्तव्य चांगले तऱ्हेनें बजवावें अशी इच्छा असल्यास खालील गोष्टीचा विचार करावा.

आपण ज्या मनुष्यास निवडणार तो मनुष्य कोणच्या स्वभावाचा आहे त्याचे विचार आपण त्याला जें काम करण्यास लावणार आहों त्यां संबंधानें कसे आहेत; जरी चांगले आहेत किंवा वाईट आहेत हे समजण्याचें आपल्या आंगांत ज्ञान नसलें तरी ते विचार आपणाला संमत आहेत किंवा नाहीं हें पाहिले पाहीजे, तो म्युनिसिपालिटीचे काम आपलें कर्तव्य आहे असें समजून बजाविणार आहे किंवा नाहीं; सदरहू काम करण्याची त्याची शक्ति आहे किंवा नाहीं इत्यादी गोष्टीचा विचार करून नंतर निवडणूक करावी अमुक मनुष्य सावकार आहे, किंवा वकील आहे किंवा शिरस्तेदार आहे किंवा मोठा व जबदार मनुष्य आहे ह्मणूनच त्याची निवड करूं नये. म्युनिसिपालिटींत येऊं इच्छिणारे मेंबर दोन प्रकारचे असतात. एक आपणाला अधिकार प्राप्त होतो व आपलें गांवांत वजन वाढतें ह्मणून मेंबर होण्याची इच्छा करितात. दुसरें केवळ सार्वजनिक हितांचें काम निःपक्षपातानें करून सर्वांचें हित करावें असें असतात अधिकार किंवा मान याची ते परवा ठेवीत नसतात. लोकांचें हित काय तें दुसऱ्या प्रकारच्या लोकां पासून होतं पहिल्या प्रतीचे लोक केवळ अधिकाराकरितां म्युनिसिपालिटींत आले असल्या मुळें व आपला अधिकार लोकांना समजावा अशी उत्कट इच्छा असल्यामुळें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करितात. अशा मेंबरा पासून कांहीं फायदा न होता उलटा अपाय मात्र होतो तर याही गोष्टीचा चांगला विचार केला पाहिजे.

लार्ड रिपनचा आपणाला स्थानिक स्वराज्य देण्या मध्यें असा एक उद्देश आहे कीं प्रत्येक गांवांत म्युनिसिपालिटीचे किंवा ग्राम व्यवस्थेचें काम जाणणारे बरेच लोक असले पाहिजेत व ज्या गांवांत असे लोक जितके अधिक असतील तितका तो गांव अधिक सुधारला जाणार आहे. एवढ्या करितां पाळी पाळीनें सर्व मनुष्यांना म्युनिसिपालिटींत येण्याची सवड दिली पाहिजे व हे चांगलें चालावें ह्मणून नेहमीं जुने अनुभवशीर मेंबर व नवीन मेंबर म्युनिसिपालिटींत येतील अशी व्यवस्था ठेविली पाहिजे. ही सूचना करण्याचें विशेष कारण असें आहे कीं हल्लीं नवीन निवडणूक होणार आहे तर कदाचित लोकांच्या मतानें जुने मेंबर निवडण्यांत कांहीं फायदा नाहीं असें वाटेल व कदाचित जुने मेंबरही कामाच्या दगदगीमुळें त्रासले असल्यामुळें काम करण्यास इनकार करतील. परंतु अगदींच नवीन म्युनिसिपाल कमिटी बनणें कांहीं इष्ट नाहीं त्यांत निदान थोडे तरी अनुभवशीर मेंबर असले पाहिजेत व अशी व्यवस्था असल्यानें काम सुरेख चालतें ह्मणून कायद्यांतही अशी अट आहे कीं दरसाल कांहीं मेंबरांनीं जात जावें व त्यांच्या जागीं नवीन येत जावे हल्लीं अकोल्यास हा प्रसंग पहिलाच आहे तरी लोक आपलें कर्तव्य चांगल्या रीतीनें बजावतील व ज्यांनीं ही उदार दृष्टीनें आपणास देणगी दिली आहे. त्याच्या अंतःकरणास आनंद देतील अशी आमची त्यांना विनंती आहे.

हिवाळ्यांच्या सुटी नंतर पार्लमेंट बसलें तेव्हां महाराणी साहेबांनीं जे भाषण केलें त्यांत हिंदुस्थान संबंधाचे कांहींच उद्गार निघाले नाहींत. ही ढोबळ चूक दुरुस्त करून तिजवर झांकण घालावें या करितां स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं भाषण करून असें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानांत सध्यां जिकडे तिकडे आबादी आहे या करितां त्या देशासंबंधानें उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं! खरी गोष्ट आहे. हजारो लोक दुष्काळानें अन्नान्न करून मरत आहेत; गरीबगुरीब शेतकरी कराच्या बोज्या खालीं दबून त्यांचा चुराडा होत आहे. अशा सारख्या गोष्टींना आबादानी न ह्मणावें तर काय! दुरून डोंगर साजरे ह्मणतात तें खोटें नाहीं.

लार्ड साहेबांच्या वरील भाषणांतच पुढें पुढें जे उद्गार निघाले ते आम्हा लोकांना आशाबद्ध करणारे आहेत साहेब बाहादुरांनीं बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानवासी लोक आपल्यास राजकीय हक्क अधीक देण्या बद्दल भांडत आहेत तिकडे सरकारचे बिलकुल दुर्लक्ष आहे असें समजूं नये सरकारचे त्यांकडे लक्ष आहे व पुढेंमागें लोकांचा हा हेतु सरकार पुरवीलही. त्याच प्रमाणें मिठावरील कर कमी करण्या बद्दलही सोन्याची अक्षरें साहेबांच्या तोंडांतून निघालीं आहेत. बोलण्या प्रमाणें करणी होवो ह्मणजे झालें. नाहींतर अशीं पोकळ वचनें आमच्या देशांतच आम्हाला दररोज १०-५ देत असतात.

ऐरलंडचे प्रसिद्ध पार्नेल हे फिनिक्स पार्क मध्यें जी मोठमोठ्या सरकारी अम्मलदारांचीं कतल झाली त्यांत सहायभूत होते अशाबद्दल लंडनटाईम्सनें उल्लेख केल्यावरून त्याची चौकशी करण्या करितां आज पुष्कळ दिवस लंडन मध्यें एक स्पेशल कमिशन सारखेंच कमिशन बसलें आहे. टाईम्स पत्रकर्त्याचे हे लेख त्याला मिळालेल्या पार्नेलच्या सहीच्या पत्रांच्या आधारावरून लिहिले होते व टाईम्सचा सर्व भरवसा या पत्रांवरच होता. हीं पत्रें मिळविण्याकरितां त्या पत्राला १०००० रुपये खर्च करावे लागले होते आजपर्यंत ही पत्रें खरीं आहेत अशा समजावर टाईम्स विजयी होऊन पार्नेल साहेबांवर खचित आफत येते असें सर्वांस वाटत होतें. परंतु पुढें झालेल्या चौकशीवरून सर्व फासे फिरले आहे. ज्या गृहस्था कडून हीं पत्रें आलीं तो पिगट नांवाचा कोणी सहासी मनुष्य आहे. हा मनुष्य पूर्वी पार्नेल पक्षाचा होता व पुढें दोहोंकडून पैसे उपटण्या करितां टाईम्सच्या पक्षाला मिळाला होता. त्यानें आतां असें कबूल केलें आहे कीं हीं पत्रें बनावट आहेत व त्यांतील २ तर मी स्वतः बनविलीं आहेत! हो स्वारी आपल्यावर आलेली आफत पाहून फरारी होऊन फ्रांसांत गेली होती. पुढें माद्रीड येथें त्यांचा पत्ता लावून कैद करणार तों त्यांनीं आत्महत्याही केली असें समजलें आहे. पार्नेल साहेबांवर आलेलें अरिष्ट अशा रीतीनें दूर झालेलें पाहून सर्व सत्य प्रिय लोकांस आनंद होईल यांत संशय नाहीं.

आमच्या इलबीड कारफर्द प्रकरणाला खूप जोर आला आहे. साहेब बहादूर तर सुटणारच. पण सध्यां आता आमची मामलेदार मंडळी मात्र फासांत पडलेली आहे. इंग्रज पत्रकार त्यांवर तुटून पडून "निमक हराम" "हराम, खोर" अशी नांवाची पुष्प वृष्टी त्यांवर करीत आहेत. नशीब बिचाऱ्यांचें.

वर्षाचा अगाऊ ... (torn)
सहामाही ११ ३ ११ ०८
सालअखेर ११ ७ ११ ०८
किरकोळ अंकास..........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस........०१

annum in advance 5 Postage 13 as.
Per annum in arrears 7 " 1Rs. 6 as.
Six monthly............3 " 6 as.
Single copy.......................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 11 MARCH 1889 NO. 10

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख ११ माहे मार्च सन १८८९ इ० अंक १०

*K. B. Rele and, caclousco smosteffi.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें निर्धोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितो ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें कचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

चट्टा, घांदी, सर्व नव्या व जुन्या जखम्या घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतों, पडसे, दमा नाडी, क्षयाचा,, डांग्या घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियन नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाइन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पोव्धारा, टिंकचर्स, सल्ट्स, इनोज, फुरुट सालट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई

हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विक्रणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषवाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
समजुतीच्या टिपा व मुंबई,कलकत्ता,मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यांसुद्धां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

मुक्काम वाशीम ता० ६-३- ९

रा० रा० वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष हल्लीं आकाश साफ असते. उष्णता फार होते. थंड पाण्यावर वासना जाते. माहामारीचा उपद्रव पुसद तालुक्यांत फार आहे. येथून सिरपुर साहा कोस आहे तेथें ही ह्या बयानें आपला अंमल बसविला आहे. आतांशी कोठें उष्णतेला प्रारंभ होत आहे. इतक्यातच ह्या भयंकर रोगानें प्रारंभ केला आहे. तर पुढें कसें होईल कोण जाणें.

गव्हांची कापणी बहूतेक झाली तेव्हां आतां पिकें चांगली होऊन निधोक पदरांत पडली असें ह्मणण्यास हरकत नाहीं अजून फारशी स्वस्ताई होत नाहीं. पाण्याची तूट पडेल असा रंग दिसतो.

मि० त्रिंबकराव कायमचे पोस्टमास्तर रजेवरून परत आले. मिस्तर चंदुलाल हे आपल्या जागीं परत जातील. मोप येथें टप्प्यांचें काम शाळा मास्तराकडे आहे. तेथें कांहीं पैशाचे कामात अफरा तफर अगर चूक झाली आहे अशा संशयावरून चौकशीकरितां मिस्तर व्यंकटराव पोस्टचे इन्स्पेक्टर तिकडे गेले आहेत असें ह्मणतात. बिचाऱ्या तेथील मास्तरावर एखादें किंवळ न येवो.

मेहरबान डे० कमिशनर साहेब यांची स्वारी लोकल बोर्डाच्या कामाकरितां पुसदाकडे गेली आहे असें ह्मणतात. मे० डे० ए० इन्स्पेक्टर यांची स्वारी उमरखेडाकडे आहे. अजून पहिली वार्षिक तपासणी झाली नाहीं मग दुसरी कशी कधीं होणार हें समजत नाहीं अलीकडे तपासणीचें काम वाढलें आहे असें ह्मणतात. कारण सरकारी शाळाशिवाय गांवठी शाळांची संख्या फार झाली आहे कोणाला खाण्यास मिळत नाहींसे झालें कीं एखाद्या खेड्यांत जाऊन तेथें गांवठी शाळा स्थापन करून बसतो. येथील लोकल बोर्डाचे काम अकरा तारखेच्या सुमारास होणार आहे असें समजते. मुनसिपालिटीचे मेंबर निवडण्याचें काम एप्रील महिन्यांत चालणार असें ठरल्याचें ऐकूं येतें. पाहावें मग लोक योग्य मनुष्यानां मतें देतात किंवा हांजी हांजी करणाऱ्यांना देतात. मतें देणारा वेणारांची योग्यता या प्रसंगी समजून येणार आहे.

रा० रा० बाळकृष्ण विश्वनाथ मास्तर बेलखेड तालुके अकोट यांची स्वारी पेनशनचें सरटिफिकीट करितां येथें आली आहे. आपापले जिल्हे सोडून हे लोक येथें कसे येतात कोण जाणें. हें लोक असें समजतात कीं काय येथें सरटीफिकेटांची खाण आहे. त्यांतून एक काढून न्यावें!! असो तरी बिचारे लांबून येथें येतात. त्यांस विनमुख जाणें लागत नाहीं. ही मोठीच गोष्ट समजली पाहिजे. व त्या बद्दल दात्यांची मोठी तारीफ केली पाहिजे.

येथील इं. म. शाळेंतील थर्ड अ. मास्तर आजारी पडून एक महिन्याचे रजेवर गेले आहेत. त्यांस आराम होऊन बिचारे लवकर आपले कामीं हजर होवोत.

मे. डायरेक्टर साहेब बहादूर यांची स्वारी तारीख १।३।८९ इसवी रोजीं सायंकाळीं येथें आली व तारीख २।३।३।८९ रोजीं सर्व शाळाची तपासणी करून तारीख ३।३ ८९ इसवी रोजीं अकोल्याकडे रवाना झाली. वऱ्हाड शाळाखातें स्थापन झाल्या पासून कायमचे व बदली मिळून पूर्वीं पाच डायरेक्टर होऊन गेले परंतु कामाचो व खात्यांत काम करीत असलेल्या लोकांची पुरी माहिती असें हल्लींचेच डायरेक्टर होत. यांचे वृत्ती शांत. ह्या किती ह्मणून सांगू याची काम करण्याची शैली इतकी चांगली आहे. कीं सर्व खात्याचे मुगुटमणी आलेक्झान रासेडेट साहेब बहदूर हे यांची स्तुती करितात. यांच्या सारखे योग्य चालक खात्याला याच्या पश्चात मिळणें नाहीं अशी कित्येकांची समजूत आहे.

मे. हिंदुस्थानी डे. ए. इनस्पेक्टर यांची स्वारी येथें येऊन हिंदुस्थानी शाळची परीक्षा झाली. निकाल बरा झाला असें ह्मणतात ह्या शाळेस मदत मे. तहशीलदार साहेब व मे. हशमत अली साहेब अस्त्याची यांची असे. हें या उभय सरदारांनां मोठें भूषण आहे. परंतु हे लोक मराठी शाळा कडे ढुंकनही कधीं कां पहात नाहींत. कोणजाणें. परंतु मे. हशमत अली साहेब यांच्या दातृत्वाची स्तुती आहे.यांनीं उमरावती हाय कुलांत स्कॉलरशिप ठेविली आहे. असें ह्मणतात. अशा मोठ्या लोकांनीं विद्येच्या कामीं मदत करणें हें यांना मोठें भूषण आहे. पत्रकर्तेराव नीट वाचून छापावें लोभ कीजे हे विनंती.

आपला मित्र
"क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिती फाल्गुन शुद्ध ९ शके १८१०

## मुनिसिपल कर देणा रावरील जवा बदारी.

नवीन मुनिसिपल कायदा पसार होऊन

जरी बरेंच दिवस झाले आहेत व तो वऱ्हाडास लागू ही जरी बरेंच दिवसापासून केला आहे तरी मुनिसिपालिट्यांची रचना नवीन कायद्याप्रमाणें केलेली नव्हती ती आतां येत्या एप्रील महिन्या पासुन होणार व तेव्हांपासून प्रत्येक मुनिसिपालिटींत लोकांनीं निवडलेले दोनतृतीयांश मेंबर व सरकारांनीं निवडलेले एकतृतीयांश मेंबर राहतील.

आज बरेंच दिवसापासून लोकांची अशी कुरकुर होती कीं मुनिसिपालटींत सरकारनियुक्त मेंबर असल्यामुळें मुनिसिपाल कमेटीचीं कामें चांगलीं होत नाहींत. कारण होतां होईल तोंपर्यंत असे सरकार नियुक्त मेंबर सरकार इच्छेविरुद्ध जात नसत व मुनिसिपालिटींत "जी हुजूर" "आपके माफक मेरीभी राय है" असेंच ह्मणणारे लोक फार असल्यामुळें लोक हितांचे कामाची बरीच अनास्था होत असे. आमचें हें ह्मणणें खरें किंवा खोटें याजबद्दल वाचकांची पूर्ण खात्री असेलच. मे. सांडर्स साहेब माजि कमिशनर यांच्या उठावर उमरावती मुनिसिपाल कमेटीनें जेव्हां कर बसविला तेव्हां काय प्रकार झाला हे वाचकांच्या लक्षांत आहेच. कमेटीला एकदम ७००० रुपयांची टोपी बसली व त्यावेळेस एक ही मेंबर आपलें डोकें वर काढून सदरहूबद्दल विरुद्ध मत देण्यास धजला नाहीं. परंतु हल्लीं लार्ड रिपन साहेबांच्या अनुग्रहामुळें ती शोचनीय स्थिती जाऊन आपलें हीत किंवा अनहीत करण्याचा अधिकार आपणास प्राप्त झाला आहे व तो चांगल्या रीतीन बजावणें हें आपलें कर्तव्य आहे.

जेथें अधिकार आहे तेथें जबाबदारी पाहिजे हे इंग्रजी राज्यनीतीच्या मुख्य तत्वांपैकीं एक तत्व आहे. आणि ज्या अर्थीं आपण बहुशः इंग्रजी राज्य नीतीचेंच अनुकरण करीत आहों. त्या अर्थीं आपणास ही तेंच तत्व मान्य केलें पाहिजे आणि सदरहु तत्व खरें आहे किंवा खोटें आहे याचा विचार करण्याची वेळ आपणास आज आली आहे. आपल्या मुनिसिपालिटींतून कायद्या अन्वयें जे लोक मत देण्यास योग्य आहेत त्यांना तुह्माला मत देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे अशाबद्दल व्हाईस प्रेसिडेंट साहेबांच्या सहीच्या चिठ्या आल्या अहेत व ह्या अधिकारापासून उत्पन्न होणारी जबाबदारी योग्य रीतीनें कशी बजाविली जाईल याबद्दल सर्वांनीं चांगला विचार केला पाहिजे.

मुनिसिपाल कमेटीचें काम केवळ रिकामपणाचे व बेफायदेशीर आहे व हे केवळ ज्यांना कांहीं काम नाहीं व ज्याना वेळ घालविण्यास कांहीं दुसरे मार्ग नाहींत त्यांनींच करावें अशी कित्येकांची समज आहे. परंतु ही समज केवळ अज्ञानपणाची आहे. मुनिसिपाल कमेटीचें काम करण्यांत फार महत्व व जबाबदारी आहे, आज आपल्या मुनिसिपालिट्याची स्थिती चांगली नाहीं. व ती तशी असण्याचें कारण केवळ लोकांचा हलगरजीपणा हें होय. पण या पुढें ही स्थिती सुधारणें इष्ट आहे किंवा नाहीं याचा प्रत्येक मत देणारानें विचार केला पाहिजे. हजारों जिवांचें सुखदुःख या म्युनिसिपालिट्यांवर अवलंबून आहे. त्याच प्रमाणें स्वच्छता पिण्याच्या पाण्याची सुबत्ता व शिक्षणाचा चांगला पाया ह्या तीन गोष्टी आमच्या म्युनिसिपालिट्यांच्या हातांत आहेत व ह्या बद्दल चांगला विचार केला असतां आह्मी ह्मणतों हें सत्य नाहीं असें कोणी ह्मणणार नाहीं. प्राथमिक शिक्षण जर चांगलें मिळालें नाहीं तर आमच्या लोकांची विद्या आटोपलीच असें समजलें पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या चांगूलपणावर दुय्यम प्रतीचें शिक्षण अवलंबून आहे. आमच्या शिक्षणाचा पायाच जर कच्चा राहिला तर इमारत कोठून घडणार. शिक्षण चांगलें होण्या करितां शिक्षक वर्ग चांगला असला पाहिजे त्यांना योग्य वेतन मिळालें पाहिजे. त्यांचा पगार वेळेवर मिळाला पाहिजे, शाळागृहें चांगलीं असलीं पाहिजेत, व शाळांची देखरेख ठेविली गेली पाहिजे. गांवाची हवा चांगली टेवणें व ती बरी असली तिला बिघडून देणें हें म्युनिसिपालिटीचें काम आहे. शहराला विपूल पाण्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी म्युनिसिपालिटीवर आहे. आणि तें पाणी स्वच्छ निरोगी आहे किंवा नाहीं हें पहाणें व तसें नसल्यास योग्य उपायांची योजना करणें हेंही काम म्युनिसिपालिटीचेंच आहे. रोजच्या रोज शहरांतील घाण निघतें किंवा नाहीं, शहरांतील घाणेरडीं ठिकाणें स्वच्छ होतात किंवा नाहीं, नवीन घाण न होण्या करितां कोणचे उपाय योजावेत लोकांना घाणेरड्या सवई बऱ्या वाईट रीतीनें सोडावयास लावणें, घरें प्रशस्त व हवाशीर होतील अशा बद्दल काळजी ठेवणें; व रस्ते रुंद करण्या बद्दल नेहमीं मनांत कळकळ बाळगणें व हरएक प्रसंग आला असतां त्याचा उपयोग करून घेणें इत्यादि सर्व कामें म्युनिसिपालिटीचीं आहेत. हीं कामें महत्वाचीं व जबाबदारीचीं नाहींत असें ह्मणतां येईल काय! आपल्या अकोल्यांत नेहमीं रोगराई असते व बहुतेक दरसाल यात्रा उत्पन्न होतो याला म्युनिसिपालिटी कांहीं अंशीं कारण नाहीं काय! आजपर्यंत वर लिहिलेलीं कामें सरकाराकडून किंवा त्यांनीं निवडलेल्या लोकांकडून होत असल्यामुळें त्याच्या बऱ्या वाईटाबद्दल आपण जबाबदार नव्हतों. व अशाचें खापर सदहू मेंबरावर किंवा सरकारावर फोडण्यास तयार होतो. परंतु हल्लीं आपली स्थिती बदलली आहे. आतां आपणास नांवें ठेवण्यास मार्ग नाहीं. बरें वाईटाचे जबाबदार या पुढें आपण होऊं. आपल्या मुखत्यारांनीं जें काम केलें तें आपण केलें असें समजलें पाहिजे. जो काय विचार करावयाचा तो आधीं केला पाहिजे, कारण या निवडलेल्या लोकांच्या हातीं आपण आपल्या सुख दुःखाची जबाबदारी देतों आहों; तर या बद्दल चांगला विचार करून आपलें कर्तव्य बजाविलें पाहिजे.

निवडणूक करणाऱ्या लोकांनीं आपलें कर्तव्य चांगले तऱ्हेनें बजवावें अशी इच्छा असल्यास खालील गोष्टीचा विचार करावा.

आपण ज्या मनुष्यास निवडणार तो मनुष्य कोणच्या स्वभावाचा आहे त्याचे विचार आपण त्याला जें काम करण्यास लावणार आहो त्यां संबंधानें कसे आहेत; जरी चांगले आहेत किंवा वाईट आहेत हे समजण्याचें आपल्या आंगांत ज्ञान नसलें तरी ते विचार आपणाला संमत आहेत किंवा नाहीं हें पाहिले पाहीजे, तो म्युनिसिपालिटीचें काम आपलें कर्तव्य आहे असे समजून बजाविणार आहे किंवा नाहीं; सदहू काम करण्याची त्याची शक्ति आहे किंवा नाहीं इत्यादी गोष्टीचा विचार करून नंतर निवडणूक करावी अमुक मनुष्य सावकार आहे, किंवा वकील आहे किंवा शिरस्तेदार आहे किंवा मोठा व जनदार मनुष्य आहे ह्मणूनच त्याची निवड करूं नये. म्युनिसिपालिटींत येऊं इच्छिणारे मेंबर दोन प्रकारचे असतात. एक आपणाला अधिकार प्राप्त होतो व आपलें गांवांत वजन वाढतें ह्मणून मेंबर होण्याची इच्छा करितात. दुसरें केवळ सार्वजनिक हिताचें काम निःपक्षपातानें करून सर्वांचें हित करावें असें असतात अधिकार किंवा मान याची ते परवा ठेवीत नसतात. लोकांचें हीत काय तें दुसऱ्या प्रकारच्या लोकां पासून होतें पहिल्या प्रतीचे लोक केवळ अधिकाराकरितां म्युनिसिपालिटींत आले असल्या मुळें व आपला अधिकार लोकांना समजावा अशी उत्कट इच्छा असल्यामुळें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करितात. अशा मेंबरा पासून कांहीं फायदा न होता उलटा अपाय मात्र होतो तर याही गोष्टीचा चांगला विचार केला पाहिजे.

लार्ड रिपनचा आपणाला स्थानिक स्वराज्य देण्या मध्यें असा एक उद्देश आहे कीं प्रत्येक गांवांत म्युनिसिपालिटीचे किंवा ग्राम व्यवस्थेचें काम जाणणारे बरेच लोक असले पाहिजेत व ज्या गांवांत असे लोक जितके अधिक असतील तितका तो गांव अधिक सुधारला जाणार आहे. एवढ्या करितां पाळी पाळीनें सर्व मनुष्यांना म्युनिसिपालिटींत येण्याची सवड दिली पाहिजे व हे चांगलें घडावें ह्मणून नेहमी जुने अनुभवशीर मेंबर व नवीन मेंबर म्युनिसिपालिटींत येतील अशी व्यवस्था ठेविली पाहिजे. ही सूचना करण्याचें विशेष कारण असें आहे कीं हल्लीं नवीन निवडणूक होणार आहे तर कदाचित लोकांच्या मतानें जुने मेंबर निवडण्यांत कांहीं फायदा नाहीं असें वाटेल व कदाचित जुने मेंबरही कामाच्या दगदगीमुळें त्रासले असल्यामुळें काम करण्यास इनकार करतील. परंतु अगदींच नवीन म्युनिसिपाल कमिटी बनणें कांहीं इष्ट नाहीं त्यांत निदान थोडे तरी अनुभवशीर मेंबर असले पाहिजेत व अशी व्यवस्था असल्यानें काम सुरेख चालतें ह्मणून कायद्यांतही अशी अट आहे कीं दरसाल कांहीं मेंबरांनीं जात जावें व त्यांच्या जागीं नवीन येत जावें हल्लीं अकोल्यास हा प्रसंग पहिलाच आहे तरी लोक आपलें कर्तव्य चांगल्या रीतीनें बजावतील व ज्यांनीं ही उदार बुद्धीनें आपणास देणगी दिली आहे. त्याच्या अंतःकरणास आनंद देतील अशी आमची त्यांना विनंती आहे.

हिवाळ्यांच्या सुटी नंतर पार्लमेंट भरलें तेव्हां महाराणी साहेबांनीं जे भाषण केलें त्यांत हिंदुस्थान संबंधाचे कांहींच उद्गार निघाले नाहींत. ही ढोबळ चूक दुरुस्त करून तिजवर झांकण घालावें या करितां स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं भाषण करून असें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानांत सध्यां जिकडे तिकडे आबादानी आहे या करितां त्या देशासंबंधानें उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं! खरी गोष्ट आहे. हजारो लोक दुष्काळानें अन्नान्न करून मरत आहेत; गरिब गुरीब शेतकरी कराच्या बोज्या खालीं दबून त्यांचा चुराडा होत आहे. अशा सारख्या गोष्टींना आबादानी न ह्मणावें तर काय! दुरून डोंगर साजरे ह्मणतात तें खोटें नाहीं.

---

लार्ड साहेबांच्या वरील भाषणांतच पुढें पुढें जे उद्गार निघाले ते आम्हा लोकांना आशाबद्ध करणारे आहेत साहेब बाहादुरांनीं बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानवासी लोक आपल्यास राजकीय हक्क अधीक देण्या बद्दल भांडत आहेत तिकडे सरकारचे बिलकुल दुर्लक्ष आहे असें समजूं नये सरकारचे त्यांकडे लक्ष आहे व पुढेंमागें लोकांचा हा हेतु सरकार पुरवीलही. त्याच प्रमाणें मिठावरील कर कमी करण्या बद्दलही सोन्याचीं अक्षरें साहेबांच्या तोंडांतून निघालीं आहेत. बोलण्या प्रमाणें करणी होवो ह्मणजे झालें. नाहींतर अशीं पोकळ वचनें आमच्या देशांतच आम्हाला दररोज १०-५ देत असतात.

---

ऐरलंडचे प्रसिद्ध पार्नेल हे फिनिक्स पार्क मध्यें जी मोठमोठ्या सरकारी अमलदारांची कत्तल झाली त्यांत सहायभूत होते अशाबद्दल लंडनटाईम्सनें उल्लेख केल्यावरून त्याची चौकशी करण्या करितां आज पुष्कळ दिवस लंडन मध्यें एक क्राफर्ड कमिशन सारखेंच कमिशन बसलें आहे. टाईम्स पत्रकर्त्याचे हे लेख त्याला मिळालेल्या पार्नेलच्या सहीच्या पत्रांच्या आधारावरून लिहिले होते व टाइम्सचा सर्व भरवसा या पत्रांवरच होता. हीं पत्रें मिळविण्याकरितां त्या पत्राला १०००० रुपये खर्च करावे लागले होते आजपर्यंत ही पत्रें खरीं आहेत अशा समजावर टाईम्स विजयी होऊन पार्नेल साहेबांवर खचित आफत येते असें सर्वांस वाटत होते. परंतु पुढें झालेल्या चौकशीवरून गर्व पार्हेंड फिरलें आहे. ज्या गृहस्था कडून हीं पत्रें आलीं तो पिगट नांवाचा कोणी महाठग मनुष्य आहे. हा मनुष्य पूर्वीं पार्नेल पक्षाचा होता व पुढें दोहोंकडून पैसे उपटण्या करितां टाईम्सच्या पक्षाला मिळाला होता. त्यानें आतां असें कबूल केलें आहे कीं हीं पत्रें बनावट आहेत व त्यांतील २ तर मी स्वतः बनविलीं आहेत! हो स्वारी आपल्यावर आलेली आफत पाहून फरारी होऊन फ्रांसांत गेली होती. पुढें माद्रीद येथें त्यांचा पत्ता लावून कैद करणार तों त्यांनीं आत्महत्याही केली असें समजलें आहे. पार्नेल साहेबांवर आलेलें अरिष्ट अशा रीतीनें दूर झालेलें पाहून सर्व सत्य प्रिय लोकांस आनंद होईल यांत संशय नाहीं.

---

आमच्या इलाखीड क्राफर्ड प्रकरणाला खूप जोर आला आहे. साहेब बहादूर तर सुटणारच. पण सध्यां आतां आमची मामलेदार मंडळी मात्र फासांत पडलेली आहे. इंग्लिश पत्रकार त्यांवर तुटून पडून "निमक हराम" "हराम खोर" अशी नांवाची पुष्प वृष्टी त्यांवर करीत आहेत. नवीन निघाल्याचें.

The Berar Samachar

MONDAY MARCH 11 1889

## OURSELVES.

*We request our subscribers will allow us the usual Shimga Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our office will be closed for the holidays there will be no paper issued next week.*

## A FEW RESULTS OF OUR JUDICIAL SYSTEM.

What we do expect in the new judicial scheme is a radical change in the system of appointments to Judicial offices. If the present system goes on, the province will not be a whit better. The mere change of name would do us no good. It is no use changing the mere form but the spirit and substance. So also in the matter of Judicial work turned out by the officers now on the Bench, there must be a radical change in the theory that regulates Judicial work at present. The present idea is, that the number of cases decided by a Judge is an index of his abilities and fitness for holding office. But mere quantitative results are useless and unmeaning unless they also weigh considerably in the scale qualitatively. If one Judge decides a greater number of cases than another, surely that is *some* test of his despatch, but if the judgments that are daily manufactured do not come up to the standard, the mere amount is altogether useless. Remarks are often noticed in the yearly Reports that Mr. so-and-so Judge decided so many cases; but the quality of the work turned out which more than anything else ought to be commented upon, is never noticed. If this is the guiding theory, we must expect corresponding results. The Judges in the Lower Court want to show off a certain number as decided during the month; and they have to resort to a number of dodges for the purpose. Issuing summonses for final disposal in cases which really can't be disposed of at the first hearing dismissing cases for default of parties, want of a proper attention to the evidence before them are some of the results of this mischievous theory. The Courts have according to the strict letter of the law an undoubted power of issuing summonses for final disposal; and also to dismiss cases when parties do not appear in time. But if both are indiscriminately used the result must be a failure of justice. But what is to be done. Higher authorities look to numbers and dismissals for default is the easiest way to show off disposals and disburthen a heavy file.

Duration of cases is another bugbear. Explanations are often required of the lower Judges why certain cases required a certain number of days. We can understand the solicitude of Government in this matter. People ought to get speedy justice; but at the same time it must be remembered that undue haste is as bad as and even worse than tardy justice; and especially so when the appellate Courts are inclined to agree with the Lower Courts and the chances of reversal are so few. In the Bombay Presidency, if a case exceeds *one year* in duration, the Judges have to submit an explanation; but not before that time The only thing to be watched by the superior Courts is that the Lower Courts do properly use their time; and to guard against waste of time and neglect of duty by the Lower Courts it will be enough if a daily Diary is called for by the District Courts from the Lower Courts. This will give the higher Courts an insight into the work of the Judges and if it is found that their time is fully occupied, it can never be said to their discredit that they have not been able to turn out so many more decisions. And if Government want to see *good work* done, and that *speedily* they must appoint a greater number of Judges than at present.

(To be continued.)

## HYDERABAD RESIDENCY ORDERS, MARCH 1 1889.

The Resident is pleased to appoint Mr. A Elliott, Assistant Commissioner of the 1st Class (Officiating Special Assistant Commissioner) in the Hyderabad Assigned Districts, to be a Member of the Amraoti Municipal Committee, vice Captain Garrett transferred.

First Class Hospital Assistant Mir Vilait Hoosain, who has been entertained in the Berar Subordinate Medical Service with effect from the 7th January 1889, is posted to do duty under the orders of the Civil Surgeon, Amraoti District.

The following postings of Officers are ordered consequent on the transfer of Maulavi Muhommad Nizam-ud-din Hasan Khan, Assistant Commissioner of the third Class and Officiating Assistant Commissioner of the 2nd Class in the Hyderabad Assigned Districts, to Ajmere:—

Mr. Maniksha Ruttanji Dastur, Extra Assistant Commissioner of the 5th Class is appointed to Officiate as Judge of the Small Cause Court, Akola vice Maulavi Muhammad Nizam ud-din Hasan Khan.

Mr. Ardasir Dinsaji, Extra Assistant Commissioner of the 5th Class, is transferred from Amraoti (Morsi) to Ellichpur, vice Mr. Keshev Rao Jey Krishna, Extra Assistant Commissioner, proceeding on privilege leave.

Mr. C. H. Price, Extra Assistant Commissioner of the 4th Class, is transferred from Akola to Amraoti (Morsi), vice Mr. Ardasir Dinshaji.

First Class Hospital Assistant M. Duragiah Pilly, in charge of the Charitable Dispensary at Shegaon, is granted privilege leave for three months from the 15th February 1889

First Class Hospital Assistant Mir Vilayat Hoosain, doing duty under the Civil Surgeon, Amraoti, will relieve Hospital Assistant Duragiah Pillay and until his return to duty hold temporary charge of the Dispensary at Shegaon.

Mr. R. W. Swinnerton, Executive Engineer, 4th Grade, sub. protem, is transferred to the charge of the Melghat Roads Sub-division with effect from date of his handing over charge of the East Berar Division to Mr. J. Craig, Executive Engineer, 1st Grade, on return of the latter officer from furlough.

Mr. L. A. Light Assistant Engineer 1st Grade, passed the Examination by the Lower Standard in Hindustani on the 5th February 1889, agreeably to Chapter II, Section 14 of the Public Works Code.

No. 37.—Mr. W. F. Heath, North Executive Engineer, 2nd Grade, North western Provinces and Oudh, temporarily employed in Hyderabad, is granted special leave from the 15th February to the 20th September 1889 inclusive under the terms of Public Works Department letters Nos. 1940-41G of 3rd October 1887.

With reference to Notification No 3, dated the 9th instant, Mr. J. Craig Executive Engineer, 1st Grade, assumed charge of the East Berar Division on the forenoon of the 13th idem.

No. 42.—The undermentioned officers are transferred from Hydrabad to Burma Provincial Establishment:—

Mr. M. P. Coode, Executive Engineer 3rd Grade (on return from furlough.)

Mr. M. J. Scobie, Executive Engineer, 4th Grade.

In continuation of this Department Notification No. 4. dated the 13th instant, L. A. Light Assistant, Engineer, 1st Grade, passed the Examination in reading native letters and accounts on the 5th February 1889 thus completing the Departmental Standared agreeably to chapter II, Section 14, of the Public Works Code.

## CORRESPONDENCE.

To,

The Editor of Berar Samachar
Akola.

Sir,

नोटीस बेशमी कस्तुरचंदजी भिकनचंद मारवाडी, जैशिंगजीदास हिरालाल, मुलचंद जुगुल किशोर, सरदारमल तेजमल नगरमदास फापट, व गणेश कृष्णाजी या सर्वांस खालीं सही करणारा कडून नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, आही तुह्मां पासून फुलो गुड तऱ्हेचा माल फालगुन शुद्ध १५ चे अंतील कराराचा खरेदी केला आहे तो माल आम्हांस देण्याच्या मुदतीचा करार फार जवळ आला आहे म्हणून कळवितों कीं, सदरहू मुदतीचे अंत मालमोजून देऊन आपली रकम चुकती करून घ्यावी. तसें न कराल तर आम्ही तुह्मावर रीतीप्रमाणें काम चालवून जो भाव फालगुन वद्य १ दिवशीं राहील त्या भावाप्रमाणे तुह्मापासून रकम भरून घेऊ तुह्मी तुमच मतानें भाव कापाल तो मान्य करणार नाहीं कळावें तारीख १२ माहे मार्च सन १८८९ इसवी.

( सही ) शिवलाल हिंमतराम दस्तुर हिंमतराम खुद.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

वाशिम ता. ८।३।८९.

रा. रा वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष या जिल्ह्यांतील डे. ए. इन्स्पेक्टरचे क्लार्क रा. रा. भाऊराव यादव हे आज दोन वर्षें जेवर आहेत या रजेच्या मुदतीत ते हैद्राबादेकडे जाऊन त्यांनीं तिकडे वकिली करण्याची सनद संपादन करून त्यांचे तिकडे बरें चाललें आहे असें म्हणतात व तिकडचें बरें टाकून ते आपल्या पूर्व पदावर येतील असें वाटत नाहीं असें लोक म्हणतात. कदाचित असी गोष्ट घडली तर हल्लीं त्यांचे जागेवर काम करीत असलेले गृहस्थ आपले परम मित्र यांचा कायम होण्याचा हक्क दिसतो, खात्यांतील नोकरीचे मुदत, पूर्वीचा पगार, कामाचा अनुभव व लोक प्रियता यासंबंधानें या जागेवर कोणी असा तसा पोहोंचतो किंवा कसे याचा विचार करूं या. यांचे विद्याज्ञान आठव्या इयत्तेच्या पलीकडे फारसें असेल असें दिसत नाहीं. कारण हे कधीं इंग्रजी बोलत नाहींत व स्वतांचे इंग्रजी कधीं लिहित नाहींत, व कधीं तें लिहिण्याची पाळी आल्यास तसें करण्याची मार मार पडते असें म्हणतात. हल्लीं तर तीस रुपयांवर दोन परीक्षा पास झालेला इसम सहज मिळू शकतो. तेव्हां दोन परीक्षा कोठें न आठवी इयत्ता कोठें!! असें आहे ह्मणून विद्येसंबंधी यांचा हक्क कोणत्या ही प्रकारें त्या जागेवर पोहोंचत नाहीं. नुसत्या नोकरीच्या मुदतीकडे सच पाहूं लागलें तर कित्येक ठिकाणी वीस तप पर्यंत काम करीत असलेले शिपाई आढळतात, परंतु त्यांचा जो आठ अगर नऊ रुपये पगार असतो त्याच्या पलीकडे त्यांची फार दिवसांची नोकरी मनांत आणून बढती होत नाहीं. यावरून पहातां योग्यते शिवाय नुसती मुदतच बढती देण्यास बस होत नाहीं. तेव्हां खात्यांतील मुदतच त्यांस बढती मिळण्यास शिफारस नव्हे. यांचा पूर्वीचा पगार नुसता बारा रुपये आहे. तेव्हां बारांवरून एकदम तिसांवर उडी मारणें हें मोठें कठीण आहे. बारा आणि तीस यांच्या दर्म्यान पंधरा, वीस व पंचवीस रुपये पगाराचे असे इसम काम करीत आहेत. तेव्हां इतक्यांचे हक्क गुंडाळून ठेवणें नीति विरुद्ध आहे प्रथमतः जेव्हां बारांवरून यांस शिक्षकाचें कामावरून काढून क्लार्क केलें तेव्हांच ह्या सर्व गोष्टींचा विचार झाला पाहिजे होता. परंतु एवढी मोठी गोष्ट कोणाच्या भटकण्यांतून कशी गेली कोण जाणे. बरें यदाकदाचित त्या वेळीं असें होण्याचें कारण असें झालें असावें कीं त्यांस पहिल्यानें पंधरा रुपया वरच आणिलें होतें व सुदत ही प्रथमतः सहाच महिन्याची होती पुढें वाढता वाढता अर्ध्या पगाराची रजा एक वर्षाची संपल्यावर बिन पगारी रजा सुरू झाली तेव्हां मग यांस ही जागा मिळत नाहीं व दुसरा कोणीतरी तिकडे येतो, असें बहुतांना वाटलें होतें. परंतु यांचें नशीब इतकें जोरावर कीं यांचे बरोबरीचे [illegible] तेव्हां आपल्या हक्काची पायमल्ली झाली. असें त्या वेळीं पुष्कळ लोकांना वाटलें. परंतु ही रजेची वेळ संपल्यावर कायमचे क्लार्क परत न आल्यास ती कायमची भरती केली योग्य विचार होईल असें समजून कित्येक वाट पहात स्वस्थ राहिले. तो संधी आतां जवळ येत आहे. तेव्हां अकोला, उमरावती, बुलढाणा व एलिचपूर येथील पंधरा वीस रुपयाच्या क्लार्क लोकांच्या हक्का कडे साहेबअधिकाऱ्यांचे लक्ष पोहोंचेल असी आशा आहे.

हल्लीं काम करीत असलेल्या गृहस्थांस कामावर आणिलें तेव्हां क्लार्कच्या कामाची त्यास माहिती मुळीच नव्हती. त्यांनी मला पासून काम मे० डे. ए. इन्स्पेक्टर यांस शिकवावें लागलें. तरी आतां जुन्या क्लार्की बरोबर टक्कर मारण्या सारखे त्यांस येत असेल असें ह्मणवत नाहीं. चांगले लोक उपलब्ध असतां मग अशाशीं रीघ कां असावा हें समजत नाहीं.

आतां त्यांच्या लोकप्रियतेच्या संबंधानें पहातां असें दिसतें कीं ज्या कोणाचा एकदां उदय होतो त्याच्या मागें लोकप्रियता कशी असावयाची असा सामान्य नियम आहे हे त्याच प्रमाणे यांची बारांवरून तिसांवर बढती झाली या मुळे व क्लार्कांच्या नाराजी

झाली अशा कारणानें त्याचे इतर बंधुवर्ग मारवाड यांना यांची वागणूक आवडत नाहीशी झाली. कळावें हे विनंती.

"स"

मुक्काम वाशीम ता० ८–३–८९.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

स्वानेक सा० नमस्कार विनंती विशेष हल्लीं आकाश नेहमी अभ्राच्छादित असतें. हवा अगदीं बिघडली आहे. ताप, खोकला, देवीची साथ व कोठें कोठें झटपट माहामारीची ही एखादी होते. असा प्रकार आहे. मनुष्याच्या निवामागें अनेक रोग असून बिचाऱ्या निदान अगदीं चैन नाहीं. शिमग्याचा सण पार पडला. कित्येक लोक या सणामध्यें आपला बिभत्सपणाचा कंडु जिरवून घेत.त. ज्या कित्येकांनी त्यांच्या स्थिती बद्दल लज्जा हाणारी येईल अशा कित्येकांनीं आपला सभ्यपणा गुंडाळून ठेविला होता. कोण्या एका गृहस्थाच्यां घरीं गाणें करण्याचा बेत होऊन तेथें कांहीं मंडळी जमली होती. अर्थात तें घर असल्यामुळें तेथें त्या मंडळीची त्याच प्रमाणें वागणूक पाहिजे होती परंतु हवकें त्या मंडळीला भान रहावें कोठचे. दिला सभ्यपणा सर्व सोडून नी काय. त्या गाण्या साठीं आणिलेल्या विश्वयोषीतेच्या अवयवांची धार्मीक कणीक लिंबली गेली. व आपण कोठें आहोत याचा मंडळीनें विचार न करितां एकसारखा दोंड फोडून देण्याचा सपाटा चालविला होता. त्या गजरानें सर्व घर दणाणून गेलें होतें. घरच्या मालकांस असें झालें कीं मी कोठच्या अशा कामांत पडलो! व कित्येक बड्या मंडळींचा असा सभ्यपणा पाहून कित्येक असंमंडळी म्हणू लागली कीं आमच्यांत असभ्य म्हणविणाऱ्या मंडळींत फरक तो काय! ज्या मनुष्यांच्या सभ्य पणानें इतरांना वळण लागावयाचें त्याच मंडळाची जर अशी दशा तर बळणारी कोणाचें घ्यावें!

ता. ११।१२ रोजीं लोकल बोर्डाचें काम चाललें होतें. लोकांची बहिर गांवाहून बरीच गर्दी जमली होती लोकल बोर्ड म्हणजे काय! त्यांत कशा प्रकारचे लोक निवडले पाहिजे होते. त्यांनी कामें कोणती त्यांची जबाब दारी कोणती वगैरे गोष्टी लोकाना चांगल्या समजल्या नाहींत असें झालेल्या निवडणुकी वरून दिसते. लोकल बोर्डा करिता दाऊन जे पैकी मेंबर ले निवडले गेले ते सर्व मारवाडी आहेत. हे सात इसम आहेत व आणखी पहा पैकीं जे निवडले ते पांच आहेत. येकुण बारा मेंबरां पैकीं जो निवड झाली आत लोकल बोर्डाचे काम समजणारा [illegible] असा इसम पाहु गेल्यास बहुधा त्यांत झाडपणें रडाण दिसते. न तें काम चांगलें झाले नाहीं म्हणजे नेटीवा मध्यें काय करण्याची करतबगारी नाहीं व ते नालायक आहेत. असे लिहून येईल व लोकल बोर्ड म्हणजे केवळ फांस आहे असें लोकांना वाटेल. मारवाडी लोकांना व्यापार करावा. त्यांना अशी नकारच काम काय होतें मत देणाऱ्या लोकांना या गोष्टी चांगल्या पाहिजे होत्या. मारवाडी लोकांचा व्यापार फार असतो. तेव्हां आपल्या शेटजीला मत दिलें असतां शेटजी खुष होऊन आपल्याला फायदा होईल कदाचित वाटून त्यांच्या कुळांनीं त्यांना मतें दिलीं असतील व बहुमताप्रमाणें कदाचित निवड झाली असेल परंतु पुढें जीं बोर्डा मध्यें जबाबदारीचीं कामें होण्याची त्याची वाट काय! पुढें काय प्रकार हो पाहूं.

श्री बाळा साहेबाची स्थापना होऊन १०९ वर्षें झालीं परंतु इतक्या काळांत श्रीजीचे दर्शनाची बंदी कधींच झाली नव्हती. परंतु तसा प्रकार या पंधरवाड्यांत झाला. त्या मुळें सर्व लोकांना अवाक वृद्धांना फार वाईट वाटलें व अतिशय दुःख झालें. कित्येक फार धार्मीक ज्यांचें श्रीचें दर्शन घेतल्यावांचून भोजन करावयाचें नाहीं. अशा कित्येकांना उपासही पडले. देवळांतलें पुराण कधींही बंद व्हावयाचें नाहीं तेंही बंद झालें. एकूण अशा अकस्मित झालेल्या प्रकारावरून लोक फार दुःखांत पडले होते. एक पोलिसचा शिपाई बाहिरच्या दर्वाजावर बसून राहिला आंत कोणास जाऊं देत नसे. एकूण सत्तेपुढें शहाणपण नाहीं. असें जें ह्मणतात तें खरें. असा प्रकार होण्याचें कारण असें झालें कीं कोणी गृहस्थ नागपुराहून काकुचे कुटुंबा पैकीं अगर त्या कुटुंबाशीं संबंध ठेवणारा श्री बाळा साहेबाचे दर्शना साठीं कुटुंबासह येत होता. वाटेत मार्गेगांवीं त्यास कुल्लाव बांतीचा उपद्रव झाला. तरीही तसा च तो नेमतेम येथें येऊन श्री बाळा साहेब मंदिरांत उतरला. पुढें कर्म धर्म संयोगान त्यास तेथें दुसरे दिवशीं देवाज्ञा झाली तेव्हां ताबडतोब असा परिणाम महामारी वांचून होत नाहीं. तेव्हां ती महामारी असावी. परंतु ही गोष्ट जिल्हाधिपती पर्यंत जाऊन वैद्यराज यांचे मतें ती महामारीच आहे असें ठरल्याचें लोक ह्मणूं लागले. पुढें हाच रोग असेल तर याचा फैलाव होऊं नये ह्मणून आठ दिवस पर्यंत लोकांनीं श्रीजीचे देवालयांत ठेऊं नये. असा हुकूम सुटला. व वर म्हटल्या प्रमाणें पोलिस पहारा येऊन बसला. आतां साहेब बहादुरांचा हेतु पहातां लोकांच्या जिवाला जपण्याचा खरा परंतु तो चांगला हेतु कित्येकांना न समजून त्यांनीं उगीच ओरड केली व मेहेरबान कमिशनर साहेब बहादूर यांजकडे या बाबतींत ताराही दोन वेळां केल्या. तीन दिवस दर्शनाची बंद होती. मागाहून पहारा उठविला. लोकांच्या मतें साहेब बहादुरांनीं धर्माच्या कामांत हात घालून दर्शन बंद करावयाचें नव्हतें. हें त्यांचें समजणें व साहेब बहादुरांचें करणें किती पत्र व्यवहाराला अनुसरून आहे याचा विचार करणें वाचकांवर सोपवितों. साहेबांची स्वारी दुबऱ्यावर आहे.

मे. डे. ए. इन्स्पेक्टर साहेब यांची स्वारी दोन दिवसांत येथें येऊन बुलढाणे जिल्ह्यांतील कांहीं शाळांची वार्षिक परीक्षा घेण्या करितां जाणार असं ह्मणतात. त्याचे शाळेचे इंग्रेजीचे मास्तर मि. आत्माराम भिसदाशिव हे येथें तारीख १९ रोजीं येथें आले. व काल पासून रजेवर आहेत. दुसऱ्या हकाद्यानें रजा मागितल्यास सुटीस लागुन मिळत नाहीं तर मग यांचे संबंधानें कायदा निराळा आहे काय. याचा विचार मेहेरबान डायरेक्टर साहेब करतील काय?

आपला मित्र

"स"

वऱ्हाडसमाचार.

मिती फाल्गुन वद्य ९ शके १८१०

या वर्षीचा हायस्कूल माजि विद्यार्थी समाज ता० १६ व १७ रोजीं उमरावतीस भरला होता. एकंदर उमरावतीच व बाहिर गावचे मिळून १९५ मंडळी जमली होती. समाजकरितां रा० रा० रघुनाथराव तळवळकर उमरावती हायस्कुलचे हेडमास्तर यांनी हायस्कूल व बोर्डीग म्यानेंजिंग कमेटीच्या स्वाधीन केले होतें. हायस्कुलची इमारत आधींच फार सुरेख त्यांत बाहुटे आवल्यानें फारच रमणीय दिसत असे. मंडळीला एकत्र भोजनास बसतां यावें ह्मणून बोर्डींग हाऊसच्या बाजूला एक उत्तम मंडप दिला होता. समाजा प्रीत्यर्थ जमलेल्या मंडळीची व्यवस्था फार चांगल्या रीतीनें राहिली. मंडळीला उतरण्या करितां, स्नाना करितां पानसुपारी करितां, जेवणा करितां, व्याख्याना करितां व त्याच प्रमाणें खेळण्या करितां निरनिराळी जागा असल्या मुळें कोणत्याच प्रकारची अडचण पडत नसे. बाहिर गांवची बहुतेक मंडळी ता. १६ रोजीं सकाळीस आली. मंडळी आल्या बरोबर म्यानेजींग कमेटीनें त्यांच्या उतरण्याची सोय लावून लागलीच सर्व मंडळीला चहाकाफीची व्यवस्था केली. मंडळीनें चहा घेतल्या नंतर लेक्चर हॉलमध्यें सर्व मंडळी जमली. नंतर सेक्रेटरी मि. कृष्णाजी मल्हार यांनीं गतवर्षीचा रिपोर्ट वाचला गतवर्षीं एकंदर ३११ रुपये वर्गणी जमा झाली व त्या पैकीं सर्व खर्च वजा जाऊन सुमारें ८० रुपये सेव्हींग ब्यांकेंत समाजाचे नांवें शिलक आहेत. या नंतर मि. खापर्डे यांनीं सूचना केली कीं दस्तुर एदलजी बहिमनजीनें अध्यक्ष स्थान स्वीकारावें. सदरहू सूचनेस मि. शहदाजीनीं अनुमोदन दिलें व नंतर सर्व मंडळीच्या टाळ्यांच्या गजरांत भाईसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. भाईसाहेबांचे सर्व मंडळी आभार मानून भाषण झाल्या नंतर सेक्रेटरीनें सर्वां बद्दल थोडक्यात माहिती सांगून एकमेकांच्या ओळखी करून दिल्या. त्यानंतर सर्व मंडळी स्नान व भोजन करण्या करितां गेली भोजन झाल्या नंतर थोडा वेळ मंडळींतल्या मंडळींत गायन होऊन पुन्हा लेक्चर हॉलमध्ये प्रोग्रामांत लिहिल्या प्रमाणें सर्व मंडळी मि. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांचें व्याख्यान ऐकण्या करिता जमली. व्याख्यान ऐकण्या करितां गावांतील इतर सभ्य मंडळी निमंत्रण केल्या वरून आली होती. खापर्डे साहेबांनीं "Socialism" या विषयावर व्याख्यान दिलें. सदरहू व्याख्यान सार्वजनिक लोकांना कदाचीत महत्वाचें वाटणार नाहीं परंतु समाजांतील मंडळीला तें फार उपदेशपर व महत्वाचें होतें व्याख्यान फारच फार सुरस व मनोहर झालें सर्व व्याख्यानाचें व्याखान जरी इथें देता येत नाहीं तरी त्यातील मुख्य मुख्य गोष्टी वाचकांच्या माहिती करिता येथें आम्ही देतो

व्याख्यानकारांनीं व्याख्यान नेमलेल्या वेळेंत आटोपतें व ऐकणारांना समजले ही जावें ह्मणून विषयाचें खाली लिहिल्या प्रमाणें विभाग केले समाज ह्मणजे काय. तो जमतो कसा, त्याची उत्क्रांती कशी होते. तो वाढला असतां इतर सर्व व्यवस्था कशी वाढवावी लागते व तो वाढविण्यास काय काय उपाय करावे लागतात. या प्रमाणें विषयाचे विभाग करून त्यावर उदाहरणा सहीत थोडक्यांत माहिती देऊन विषय ऐकणाराला चांगला समजून दिला. शेवटची व सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखी एक गोष्ट त्यांनीं सांगितली ती अशी कीं समाज सुधारण्या करितां प्रत्येक व्यक्तीनीं आपली सुधारणा केली पाहिजे. सर्व व्यक्तीची सुधारणा झाली ह्मणजे समाजाची सुधारणा झालीच. या प्रमाणें समाजांतील प्रत्येक व्यक्तींनीं आपली सुधारणा केली म्हणजे त्यांनीं आपलें कर्तव्य केलें असें आम्ही समजूं. अशा समाजांत सर्व प्रकारची सामुग्री तयार असल्यामुळें समाजांतील प्रत्येक मनुष्यांनीं तिचा उपयोग करून घेणें हें त्यांचे कर्तव्य होय. व याप्रमाणें सर्वांनीं आपलें कर्तव्य बजाविलें म्हणजे समाज भरभराटीस येईल किंवा नाहीं याची शंकाच घ्यावयाला नको.

व्याख्यान आटोपल्यानंतर ५ वाजण्याच्या सुमारास प्रेसिडेंट व इतर सर्व मंडळी खेळण्याच्या जागी गेली व तेथें सर्वांनीं, आट्यापाट्या, खोखो, व लानटेनीस (इंग्रजी या लीचा चेंडूचा खेळ) हे खेळ संध्याकाळपर्यंत खेळले. त्या नंतर मंडळीचे यथेच्छ पर्ये ठिक ठिकाणी चांदण्यात परस्परांशीं हित गुजाच्या गोष्टी बोलत फार दिवसा पूर्वी अनुभवलेल्या मित्र सुखाचा लाभ पुन्हा मिळाला आहे असें पाहून आनंदात कांहीं वेळ घेत बसले. त्या नंतर सायंकाळचा उपहार करून मंडळी मंडपा मध्ये कीर्तन ऐकण्या करिता गेली व तेथें रात्रीच्या १२ वाजे पर्यंत कीर्तन एकून निद्रास्त झाली. याप्रमाणे पहिल्या दिवसाचें कामें संपलें.

दुसरे दिवशीं म्हणजे ता. १७ रोजी आदले दिवसा प्रमाणेंच मंडळीनीं चहा वगैरे आटोपल्या वर आठ वाजता लेक्चर हाल मध्यें जमले. या वेळेस प्रोग्राम मध्ये जरी एकच काम लिहिले होते तरी सेक्रेटरीच्या सूचने वरून त्या दिवशी दोन काम ठरविली होती.

प्रथम समाजास कांहीं मंडळींनी सूचना केल्या होत्या त्यांचा विचार करण्यास सुरवात झाली एकंदर समाजा पुढें चार सूचना होत्या त्यांत पहिली सूचना ही होती कीं या समाजाच्या कांहीं शाखा स्थापाव्यांत व त्यांनीं सामाजीक सुधारणेची कांहीं कामें हातीं घ्यावींत सदहु सूचना मि. गोपाळ वामन बापटनें लेखी पाठविली होती. सदहु सूचना झाल्यावर मि. गोविंद विश्वनाथ यांनीं अशी सूचना केली आपला हा समाज फार बाल्यावस्थेंत आहे याला अद्याप कोणत्याच प्रकारचें ज्ञान किंवा शक्ती प्राप्त झाली नाहीं हा समाज चालेल किंवा नाहीं या बद्दल अद्याप संशय तर अशा स्थितींत समाजालाही सूचना करणें कांहीं बरोबर नाहीं समाज या प्रमाणेंच जर दरसाल भरत चालला तर ५।६ वर्षांनी पुढें पहातां बरेच [illegible]

कांहीं वेळ भवतीन भवती होऊन मि. गणेश नागेश वकील इलिचपूरकर यांनी अशी सूचना केली कीं या सूचना पूर्वी कळल्या नसल्या मुळें आज त्या बद्दल कोणतांच विचार करितां येत नाहीं. त्यावरून सर्वानुमतें ही सूचना पसंत ठरून पुढच्या वर्षी सर्व सुचनांचा विचार करावा असें ठरलें. या नंतर मि. बुधो कृष्ण दामले यांनीं "ज्ञाताज्ञात विचार" या विषयावर निबंध वाचला सदहू निबंधांतील भाषा फार सुरेख असून विचार फार चांगले होते. निबंध थोडा गहन विषयावर असल्या मुळें श्रोतृजनांला त्या वेळेस चांगला समजला नाहीं या प्रमाणें सकाळचें काम आटोपल्यावर मंडळी ११ वाजतां स्नान भोजनास गेली. त्या नंतर पानसुपारी व गायन झाल्या नंतर पुन्हा मंडळी मि. रामचंद्र नरसिंह मुधोळकर एल. एम. अँड एस यांचें शरीर रचनेबरील व्याख्यान ऐकण्या करितां जमली मुधोळकरांनीं व्याख्यान समजून देण्या करितां त्या दिवशीं सर्व प्रकारचीं हाडें, चरबी, मज्जा, फुफुस, काळीज स्नायु वगैरे सर्व आणले होते त्या मुळें व्याख्यान सुरस झालें व बराच भाग मंडळीस समजला गेला. व्याख्यान झाल्यावर खापर्डे यांचें थोडेसें पण चटकदार भाषण होऊन प्रेसिडेन्ट साहेबांनीं या वर्षीचा समाज संपविला. नंतर पानसुपारी, अत्तर, गुलाब वगैरे घेऊन मंडळी खेळास गेली समाज रीतीप्रमाणें जरी सायंकाळीच संपला तरी झोपेपर्यंत गाणें गायन वगैरे जें यथाक्रम व्हावयाचें तें झालेच.

या प्रमाणें मंडळीचे दोन दिवस फार आनंदांत व उपयोगांत गेले. एकंदरींत या वर्षीचा समाज फार सुरेख रीतीनें झाला. शेजमातील व बीभत्सक गाण्याच्या कर्मणूकीत शिवाय बालविधवा वेश्या अशा समाजांत बाळविणें किती शहाणपणाचें व संभावितपणाचें काम आहे. आज या समाजापासून कदाचित् कित्येकांना कांहीं फायदा होत नसेल तरी पण आह्माला खास वाटते कीं हा समाज जर सुरक्षितपणें व चांगल्या रीतीनें चालला तर आपल्या वऱ्हाडचा याच्या हातून मोठालीं कामें होतील. फार कांय कशाला हा समाज मरल्या पासून समाजांत येणाऱ्या लोकांचा शेणमाती खेळण्याची व + + + + त्या नांवानें शंख करण्याची सवय सुटत चालली. तर ही सुधारणा नव्हे काय? अशी प्रकारचा समाज चिरायु व्हावा अशी आमची फार आशा आहे.


# The Berar Samachar

MONDAY MARCH 25 1889


## PANDITA RAMABAI'S OPENING OF THE 'SHARADA SADANA.'

On Monday the 11th instant came off the opening ceremony of Pandita Ramabai's Sharada Sadan. Your readers are aware that this learned lady has returned from her trip to England and America from which latter place she has received substantial support for the Home that she proposes to establish or rather has established for the poor help less widows of India. The scheme has been already published in the leading journals and need not therefore be repeated here. Suffice it to say that the Pandita's scheme is two fold viz consisting of a Home and a day school. The Home is to be exclusively for high caste Hindu widows whereas the school may admit girls or women of lower castes also. Due provision is made for the poor by exempting them from the payment of fees and by giving them free board and lodging wherever necessary. But by for the most important thing to be remembered in connection with this institution is that no sectarian education will be imparted. Principles of morality will certainly be taught as they need be but not the tenets of any particular religion. Scrupulous care will be taken in the selection of the teachers and the pupils good character being one of the indispensable requisites.

Such is in brief an outline of the work to be done by and at the Institution that was opened on the 11th of March. We repeat the date because it is one which deserves to be marked with a red letter in our calender not only because the Sharda Sadan was declared open on that day but because our late lamented Dr. Anandibai Joshi took her degree of Mr. D. on the same day in America eight years ago. Ramabai was present at the Convocation having gone there on purpose and real social reformers must congratulate themselves on the results that have followed the Pandita's trip there. It was there in that land of freedom that she was able to do what we all now know she has done. In a telling speech delivered after the presidential address of Mrs. Kashibai Kanitkar did the Pandita inform her audience consisting of ladies and gentlemen European and Native of her various attempts in this direction and particularly in the direction of giving medical education to women before proceeding to England. She gave but one instance of how her efforts were met and that is quite enough. She went to Ahmedabad and mooted this subject. And what was she told? She received three different answers. one that it was impossible for Hindu ladies to learn medicine and surgery, another that the time had not come for that yet and a third that they could scorc out 10000 Rs. and that the Pandita should do there with work that would be done else-where in 40000 Rs. None of these three answers were of course encouraging but not daunted by them the Pandita resolutely continued her work and the result is now before the public.

The Pandita's charming and closely reasoned through simple speech delivered in pure Marathi containing not a word of English was followed by that of Mr. Sadashiv Pandurang Kelkar who read the rules of the Sadan and gave very useful and interesting information regarding Ramabai's work in America. Our readers will we feel sure be surprised to hear that she has collected no less than Rs. 90,000 in America for the object in view besides promises of subscription which will keep the Institution a going for ten years after which of course it will have to be maintained by local support. Another pleasant surprise is to be found in the fact that a Book published by the Pandita in America entitled. 'High caste Hindu woman' went through ten editions during a short period of two years though the price was as high as 5 Rs. a copy The nett sale proceeds Ramabai has appropriated towards buying electro-plated pictures for a series of books that she has composed for the use of girls and which are now in the printer's hands. The pictures it is said are really very beautiful and will immensely facilitate the education of children.

We wish the Institution every success and hope that it will be largely availed of.

---

This year the gathering of the ex-students of Berrr High schools was held at Amraoti. This was a second gathering. The first gathering was held last year at Akola. This year it was every success. Most of the arrangements were made by the managing committee on the line of National Congress. This body is open to all who come within the definition of its name. Government servants as well as private individuals can join it with all safety and open hearts. It is not a political body nor it can be called at least for the present even a social one. It is a body of persons who had once assembled together under one roof for one cause i. e. education. Its object as we understand, it is simply to make new acquaintances and renew old ones and thus to bind all by the tie of friendship that was once limited to a very narrow circle. The gathering is held every year only for two days and the members pass these two days in feasts, plays. lectures and other amusements and thus enjoy that eneviable pleasure with a free and open heart which they had once enjoyed while they were in schools. We wish this body every success.

## OPENING OF PARLIAMENT THE CUEEN'S SPEECH.

The fourth session of the twelth Parliament was held on the 1st February 1889. In which the Lord Chancellor read the Queen's speech in her Majesty's own words. But we are very sorry to say that in it no referrence was made to India.

My Lords and Gentlemen,-- During the brief period that has elapsed since the close of the last session nothing has taken place to affect the cordial relations which exist between myself and other Powers.

The operations which had been successfully completed in Egypt a few days before the last prorogation have effected the object for which they were under taken, and I see no ground for apprehending the renewal of disturbance in the neighbourhood of Suakin. The negotiation which I had directed to be opened with the rulers of Thibet for the purpose of preventing encroachment on my rights over the territory of Sikkim have not as yet been brought to a favourable conclusion but I hope that further military operation will not be necessary.

I have consented to take part in a Conference with germany and the united states at Berlin upon the affairs at Samoa, in continuation of that which was recently assembled at Washinton.

Gentlemen of the House of commons,-- The Estimates for the public service of the year will be laid before you. The unceasing expenditure upon war like preparation which has been incurred by other European nations has rendered necessary an increase in the precautions which have hitherto been taken for the safety of our shores and our commerce. The counsels by which other Powers are guided, and which dispose of their vast forces, are at present uniformly friendly to this country but I have on right to assum that this condition is necessarily secure from the possibility of change.

My Lords and Gentlemen, Some portions of the Bill which was presented to you last year for amending the Local Government of England and Wales were laid aside in consequence of the pressure upon the time of Parliament; and from the same cause it was found to be impossible to enter upon the question of Local Government for Scotland. Bills dealing with these matters will be laid before you.

Your early attention will be asked to measures for developing the material resources of Ireland; and for amending the constitution of the various tribunals which have special jurisdiction over real property in that country. The statutes which you have recently passed for the restoration of order and confidence in Ireland have already been attended with salutary result.

Legislative provision will be necessary for executing the Convention into which I have entered for the suppression of bounties on the exportation of sugar; and also for completing the conversion of the Three per Cent Annuities. The state of the gold coinage has for some years past been the subject of legitimate complaint. A measure for restoring it to a satisfactory condition will be laid before you.

Though the Commission which I appointed to inquire into the Civil Establishments of the United Kingdom has not yet completed its labours, it has already made a report of much value, and proposals for legislation arising out of that report will be submitted to you.

Several subjects which I have commended to your care in previous years, but which the increasing burden of your duties has shut out from consideration, will be submitted to you again. In this number will be included measures resting to tithes, for the regulation of the Universities of Scotland, for determining the liability of employers in the case of accidents for establishing a Deparment of Agriculture, for cheapening the transfer of land, and for remedying abuses attaching to Joint Stock Companies formed under limited liability.

I prey that the blessing of Almighty God may be with you in the discharge of your arduous duties.

---

चुकीची दुरुस्ती:—अंक १० यांत वाशिमच्या पत्रव्यवहारांत तिसऱ्या कालमांत पारा तिसरा ओळ तीन यांत मोप या ठिकाणीं माहागांव असें वाचावें.

---

## वऱ्हाड.

कुमार श्रीहरयानजी रावजी, अकि अ० यांस अकोला जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट रेजिस्ट्रर नेमलें.

मि. बापू आर. विहकाजी, अ. सु. आफ पोलीस, उमरावती, यांस एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

यंदाची वकीलीची परिक्षा ता. ९ सपटेंबर १८८९ रोजीं सुरू होणार उमेदवारांनी सर्टीफिकीट व फी वगैरे अर्ज पाठविण्याची मुदत ता० १ जून १८८९ पर्यंत आहे.

सेशन कोर्टा पुढे युरोपियन ब्रिटिश प्रजेची चौकशी होताच प्रत्येक खटल्यात ज्युरीची संख्या पांच पेक्षां कमी नसावी असें क्रिमिनल प्रो० कोड कलम २७४ अन्वयें ज्युडिशियल कमिशनर साहेब यांनीं ठरविलें आहे.

मि. आर. आबई, इंजि० अ० इं० यांस २० फेब्रुवारी १८८९ पासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

रावसाहिब वामन अनंत काळे, असिस्टंट अ० इंजिनियर पूर्व वऱ्हाड यांस १०० रुपये त्यांचा पगार मिळत होता तास अपून त्यांना आणखी दोन महिन्यांचा पगार जास्त मिळाली.

आकोट येथील पोस्ट मास्तर यांचे हातून पोस्टातील ४०० रुपयांच्या नोटा अफरातफर झाल्यामुळें त्यांजवर हल्ली खटला चालू आहे असें समजतें.

---

## वर्तमानसार.

६०००० रुपये खर्च करून एके श्रीमान गृहस्थानें काशी येथें नुकतेंच एक शिवालय बांधलें आहे.

महाराणीचा वार्षिक खर्च सालीना १ लक्ष रुपये आहे.

जे हिंदु लोक मटणपाव व चहा वगैरेचें लालचीनें गोरे अ र नटि लोकांचे टेबलावर बसतात अशा लोकांस बहिष्कृत करणारी मंडळी राजशाई येथें हिंदु मंडळी निघाली आहे.

एके इसमानें व्यापाऱ्याचें दुकानीं जाऊन कांहीं माल खरेदी केला व पैसा वर्दी देण्याचें कबूल केलें असून दिला नाहीं ह्मणून दुकानदारानें लबाडी केली हा आरोप ठेवून त्यावर माजिस्त्रेटी केली. व त्यास एक महिन्याची सजा मिळाली पण अपिलांत ही मुळींच लबाडी होत नाहीं असें ठरून त्यांस सोडून दिलें.

काठेवाड प्रांतांतील जुनागड गांवीं कांहीं खणण्याचें काम चालत असतां आंत एक भकद लागलें व एक मोठा भुजंग दिसला तेव्हां मजूर काम करण्याचें सोडून पळून गेले. गांवांत ३० मुलें त्या द्रव्यरक्षक भुजंगास बळी देणार अशी विचित्र बातमी पसरून लोक आपलीं मुलें शाळेंत अगर बाहेर जाऊं देईनात. शेवटीं भुजंगास मारल्यावर एक दगडी पेटी तेथें तारीख १६ जानेवारी रोजीं सांपडली. त्यांत एक तांब्याचा हंडा निघाला ता ऊवडा रुप्याची व सोन्याची, छहाण डबी निघून आंत चार हिरे, दोन लाकडाचे मणी असा कांहीं माल निघाला. हा माल गौतम बौधाचे वेळचा असावा असें शास्त्रवेत्ते ह्मणतात. न्या० सिं.

जी. आय. पी. रेलवेचे हद्दीं जें स्टेशन आहे तें दक्षिण महाराष्ट्र रेलवेस देण्यांत येणार असून जी. आय. पी. रेलवे कंपनी आपल्यासाठीं वेगळें स्टेशन बांधणार आहे; व त्या साठीं तिणें जी जागा घेतली तींत रा० ब० हरि रावजी चिपळूणकर यांची व मि० स्वरूपसिं यांची अशी कांहीं जागा आहे. तिच्याबद्दल त्या दोघांस अनुक्रमें कंपनीनें २९,००० व १४,३०० असे रुपये दिले. पुण्यामध्यें जागेच्या किंमती किती वाढल्या आहेत हें यावरून समजेल.

मृत्यु:— मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडिया पत्राचे व छापखान्याचे मालक जारल न्यासॉलिस यांस लंडन येथें देवाज्ञा झाली.

दी० बं०

गव्हरनर जनरल गिरिरोहण करण्या करितां ता० २ एप्रिल रोजीं कलकत्त्याहून निघतील व वाटेंत अलहाबाद व लखनौ येथें कांहीं दिवस मुक्काम करतील.

शोहाच्या राजानें अबिसिनीयाच्या विरुद्ध लढाईचा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे असें रोम येथें प्रसिद्ध झालें आहे.

गांजाचा विक्रय— ब्रह्मदेशामध्यें कोणी गांजा पाठवूं नये अशा विषयीं सरकारानें सक्त नियम ठरल्यावरून कल्पक आणि लबाड व्यापाऱ्यांनीं ह्या देशांत गांजा पाठविण्याची अगदीं नवीन कल्पना काढली. त्यांनीं विच्याचे पोटांत गांजा भरून त्यांची पार्सलें पाठविण्याचा क्रम आरंभिला परंतु ही त्यांची लबाडी बाहेर पडली आहे.

नवें उघडणारें द्रव्य:— 'बेलाईट' नांवाचें एक नवेंच उघडणारें द्रव्य विलायतेंतील लोकांनीं शोधून काढिलें आहे. त्याच्या गुणासंबंधाची प्रचिती नुकतीच इसेक्स मध्यें पुष्कळ लोकांसमोर करून पहाण्यांत आली. डायनामाइट ह्मणजे याच्या पुढें केवळ मुलाच्या खेळाप्रमाणें आहे त्याच्यावर घाव घातले असतां तें फुटत नाहीं. विस्तवांत टाकलें असतां धुमसून जळून जातें. तसेंच हातांत धरून तें काडीनें पेटविलें तरी ही हलकेच जळून जातें. परंतु त्याची विशेष कृति आहे, तशी कृति केली ह्मणजे तें कांहीं अनर्थापात करून टाकतें. त्या योगानें जमीन आणि पाणी शंभर फूट उडतें आगगाडीचे रूळ गवता प्रमाणें मोडून तोडून जातात. आणि जमिनी मध्यें मोठाच खाडा पडतो. हें द्रव्य मि. क्याफेलिअम्स नांवाच्या एका गृहस्थानें शोधून काढिलें आहे यांत नाइट्रेट आफ आमोनिया; डायनाट्रेट आफ बेन्झोल आणि साल्ट पीटर इतकीं द्रव्यें असतात. शास्त्रीय शोधाची गति कोठपर्यंत जाणार ती न कळे. पहिल्यानें दारू निघाली त्यावर जबरदस्त डायनामाइट निघालें व त्यावर त्याच्यावर कडी असें हें बेलाइट निघालें.

आंधळ्या करितां प्रेस— आंजर्स येथें राहणाऱ्या एका शाळा मास्तरणीनें आंधळ्या करितां एका प्रकारचा प्रेस काढला आहे, त्याचे साह्यानें लिहिलेला मजकूर आंधळ्याला आणि डोळसाला दोघांसही उत्तम रितीनें वाचतां येतो. तिकडील स्त्रिया दखील नवीन शोध लावण्या करितां किती झटत आहेत पहा.

सशृंग मनुष्यें— मनुष्य जातीमध्यें अशा प्रकारचे प्राणी फारच क्वचित् आढळून येतात. आपणां सर्वांस पुराणावरून माहीत आहेच कीं, पूर्वीं आमच्या देशांत शृंगी नांवाच्या एका ऋषीला एक शिंग होतें. त्या नंतर ही कदाचित् आमच्या इकडे अशा प्रकारचीं कांहीं मनुष्यें झालीं असतील परंतु आमच्या देशांत पदार्थ संग्रहालय नसल्या कारणानें लोकांना ही तीं स्थापन करण्याची आवड नसल्या कारणानें आह्मांस खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. परंतु युरोपखंडाची अशी स्थिति नाहीं. त्यांतील लोक ज्या ज्या चमत्कारिक वस्तु त्यांना आढळतात त्या त्या वस्तूंचा पदार्थ संग्रहालया मध्यें साठा करून ठेवितात. हल्लीं एडिंबर्ग येथील पदार्थ संग्रहालयांत अशा प्रकारच्या मनुष्याचीं चार शिंगें आहेत. यांतील एक शिंग सात इंच लांब असून करांगुली एवढें जाड आहे. हें शिंग इ. स. १६७१ मध्यें डाक्टर टॅपम यांनीं एलिझबेथलौ नांवाच्या एका बाईच्या डोक्यावरून पुष्कळ लोकां समक्ष कापून काढिलें. दुसरी एक मेरी डेव्हीस नांवाच्या बाईची गोष्ट अशी सांगतात. कीं तिच्या वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षीं तिच्या डोकीवर एक टेंगूळ उठलें. तीस वर्षां नंतर यांतून मेंढ्याच्या शिंगा सारखीं दोन शिंगें वर आलीं. यांतील एक शिंग नऊ इंच लांब असून त्याचा परिघ दोन इंच होता. दुसरें एक इंग्लिश ग्रंथकार असें ह्मणतात कीं अठराव्या शतकाच्या शेवटीं इंग्लंडमध्यें शिंगें असलेल्या दोन बाया होत्या. त्यांतील एका बाईचे डोकीवर शिंग पांच इंच आल्यावर तिनें तें उपटून काढण्याचा यत्न केला परंतु तें मध्येंच मोडलें. व नंतर कांहीं दिवसांनीं तें नाहींसें झालें. परंतु त्याच ठिकाणीं दुसरीं कित्येक नवीन शिंगें येत होतीं. अशा प्रकारचीं दुसरींही कित्येक उदाहरणें घडून आलीं आहेत परंतु यांत एक विशेष गोष्ट एवढी आहे कीं हा रोग बहुतकरून स्त्रियांनाच झालेला आढळतो. पुरुषांना क्वचित विरळा एकदां मात्र एका जर्मन सरदाराच्या पाठीच्या कण्यांतून एक शिंग आलें होतें.

कलकत्ता तुरुंगांतून पळून गेलेले दोघे गोरे कैदी जामकुरा येथें पकडण्यांत आले या दोघांनीं तुरुंगांतून पळून गेल्यावर सेरामपूर येथें गेले व तेथील स्टेशनावर असेन्सलचें तिकिट घेतलें व गाडींत बसले परंतु असेन्सलला न उतरतां मध्येंच उतरले यापैकीं एक आपण होऊन पोलिसाच्या स्वाधीन झाला पण दुसऱ्यानें एका सब इनस्पेक्टरास बरोबर ठोक दिला या दोघांजवळ बरीच रोकड असून ख्रिस्ती पोथीही होती हे ज्या ज्या ठिकाणीं गेले तेथें तेथें त्याचा मान उत्तम रीतीनें राहिला होता, उघड आहे. कातडी कशी होती? गोरीना, मग तशी गोष्ट घडलीच पाहिजे मग ते चोरी करणार असोत खून करणार असोत, कोणीही असोत. गोऱ्या कातडीचा महिमाच असा आहे.

ब्रह्मदेशांतील लोकांविषयीं कांहीं माहिती— ब्रह्मदेशांत लग्नाच्या मुली बारापासून पंचवीस वर्षांपर्यंत किंबहुना जास्त वर्षांच्या असतात नवरे मुलगे रात्रीं घरोघर जाऊन त्यांच्याशीं भाषणादि करून ज्याला ती लाभेल तो भाग्यवान् समजावयाचा. तिकडे लग्नाशिवाय मुली बऱ्याच असतात. व लग्नाची चाल लग्न जुळे पर्यंत बहुतेक युरोपियना सारखीच असते तसेंच गाणें व वाद्य वाजविणें व नाच हे सर्व चमत्कारिक असतात. एकंदरींत सर्व प्रकार रानटी; त्यांत सुधारण किंवा कौशल्य नाहीं. यांचे फौजीलोक जीं पुस्तकें वाचतात, तीं संस्कृताशीं अगदीं जवळ जवळ आहेत; ह्मणजे कांहींचा अपभ्रंश व कांहींचा उच्चार जरी भिन्न. उदकांत–उदक गेहा–गेह. लंभा–लाभ (केश) वगैरे शब्द हुतेक जवळजवळ आहेत मूर्तिपूजा आपल्या हिंदप्रमाणेंच; जवळजवळ आमच्याशीं जुळण्या जोग्या कांहीं रीती आहेत व कांहीं विलक्षण आहेत. मनोविकार, षड्रिपु, भावना, धारणा वगैरे शब्द अगदीं संस्कृताशीं जुळतात, परंतु संख्यावाचक विशेषणें फारच निरनिराळ्या तऱ्हेचीं. अशी रीत कोणत्याही भाषेंत आढळत नाहीं. एकया--संख्येस मनुष्यास--तयाव व इतर प्राण्यास--तगांव. इत्यादि प्रकारचा भेद आहे. ब्रह्मी लिपी बहुतकरून गुजराथी उर्दू या लिपी सारखी आहे. तींत एक प्रकारचें लिहिणें व दुसऱ्या तऱ्हेनें वाचणें असें असल्यामुळें नवीन शिकणारास [illegible] लागतो. दी० अ

भयंकर बातमी— काश्मीरचे रेसिडेंट कर्नल निस्बिट यांजकडे, काश्मीरच्या महाराजांकडून राजद्रोहोत्पादक कांहीं कपट व्यवहार सुरू असल्या बद्दलचीं कित्येक पत्रें मिळालीं आहेत असें ह्मणतात. हीं पत्रें पूर्वीं लक्ष्मणदास यांचे जवळ होतीं (ह्या लक्ष्मणदासाला महाराजांनीं कांहीं दिवसापूर्वीं आपल्या दरबारांतून घालवून दिलें अग त्याचें सर्वांस माहीत आहेच हीं पत्रें त्याचे जवळ असल्यानें त्याचा धाक दाखवून महाराजांकडून आपली दिवाणगिरी पुनः मिळविण्याची त्याला उमेद होती. ह्या कपटव्यवहारांत आणखी असा कट झाला असल्याचें कळत आहे कीं, माजी रेसिडेंट मि० प्लौडन यांस विष प्रयोग करावयाचा होता. परंतु तो कट सुदैवानें अमलांत आला नाहीं. कर्नल निस्बिट यांणीं हीं पत्रें हातीं आल्यावर जम्मु येथें जाऊन महाराजाची भेट घेतली तेव्हां त्यांणीं त्या पत्रांविषयींची कोणत्याही प्रकारें नाकबुली न करितां रेसिडेंटास असें सुचविलें कीं मी आपली गादी सोडून देतो ह्मणजे झालें. ह्या संबंधाची विशेष चौकशी करून त्या बद्दलच्या पुराव्याची चाळणा केली. रेसिडेंटाजवळ ह्या बद्दलचा पूर्ण पुरावा मिळाला असून तो घेऊन ते कलकत्त्यास जाऊन व्हाईसरायांचे कानांवर ह्या बद्दलची खबर घालीपर्यंत काश्मीरकडे कांहीं एक विशेष व्हावयाचें नाहीं. ह्या सर्व हकीकती वरून ह्या खटल्याचा कांहीं तरी अंमळ परिणाम होईल असें [illegible] दिसत आहे. काय होईल तें बघावें. अलाहाबादची ता० १० मार्चची तार

प्रसिद्ध मडम अनीबेझंट ह्या बाईनें भोपाळच्या बेगमचें प्रकरण हातांत घेऊन सर लिपेल ग्रिफिन यांची चांगली खरडपट्टी काढण्याचा निश्चय केला आहे. नुकताच तिणें विलायतेंत ह्या बद्दलचा एक जोरदार लेख प्रसिद्ध केला असून त्यामुळें तिकडे मोठी चळवळ उडून राहिली आहे.

पार्नेल कमिशनबद्दल टाइम्स पत्रकर्त्यास २० पासून ३० लक्ष रुपये खर्च झाला आहे असें लंडनचे पत्रावरून समजतें.

कम नोर सेंट्रल जेल या तुरुंगावरील जेलर माणिकजी यमवर गेलें तेगावपत केद्यास अन्नसामुग्री पुरविणारे कंट्राक्टदारापासून ४० लक्ष रुपये लांच खाल्याचा आरोप आला आहे. शिवाय आणखी कांहीं आरोप ठेवून त्याजवर खटला चालला आहे.

युवराज प्रिन्स आफ वेल्स यांचे द्वितीय चिरंजीव लवकरच मिलिटरी आफिसर होऊन या देशांत येणार आहेत.

सिक्कीमकडे पुन्हा फौज पाठविण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे असें ह्मणतात

राज्यत्याग— सर्व्हियाचे राजे क्रिमिलन यांनीं सर्व्हियाच्या गादीवरचा हक्क सोडला यांचा बारा वर्षांचा एक मुलगा आहे. तो वयांत येई पर्यंत रीजंट ह्मणून तीन सरदारांचें एक कौन्सिल त्यांनीं नेमिलें आहे. या कौन्सिलांतील मुख्य एम० रिस्टिक हे रशियाचे हस्तक आहेत व रशियाच्या [illegible] मुळेंच क्रिमिलन यांनीं राज्याचा त्याग केला असें ह्मणतात. युरोपांत भयंकर रणकंदन माजण्यास हा एक कारणीच होईल.

शतकीचें कालेज— गुजराथेंतील धनवान व्यापाऱ्याच्या मदतीनें व मुंबई सरकार यांच्या आश्रयानें अमदाबादेस एक शास्त्रीय कालेज होणें अवश्य आहे.

३०,००० रुपये दिले— जस्टिस स्काट यांनीं ठराव केला त्या ठरावावर अपील न करितां जी. आय. पी. रेलवेनें सर हेनरी मोलॅंड यांजकडे ३०००० रुपयाचा चेक पाठविला. सु० स०

हें पत्र अकोला येथें के० वा० विठ्ठलराव बळवंत फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण विठ्ठलराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.